अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.२५ एप्रिल २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २०६ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## अटीतटीच्या लढतीत दिल्लीचा हैदराबादवर सात धावांनी विजय

✔ **हैदराबाद** : अटतटीच्या लढतीत दिल्लीने हैदराबादचा सात धावांनी पराभव केला. सात सामन्यात दिल्लीचा हा दुसरा विजय होय. तर हैदराबादचा सात सामन्यात हा पाचवा पराभव झाला आहे. हैदराबाद आणि दिल्ली या गुणतालिकेतील तळाच्या दोन्ही संघाचे आयपीएलमधील आव्हान जवळपास संपुष्टात आले आहे. या दोन्ही संघाला आयपीएलमध्ये आपले आव्हान जिवंत ठेवण्यासाठी उर्वरित सर्व सामन्यात विजय मिळवावा लागणार आहे. दिल्लीने दिलेल्या १४५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ सहा विकेटच्या मोबद्लयात १३७ धावांपर्यंत मजल मारु शकला. दिल्लीकडून मुकेश कुमार याने अखेरचं षटक जबरदस्त टाकले. अखेरच्या षटकात हैदराबादला विजयासाठी १३ धावांची गरज होती, मुकेश कुमार याने या षटकात एकही चौकार न देता दिल्लीला विजय मिळवून दिला.

### आयपीएल सामना क्र.३५

गुजरात टायटन्स वि.मुंबई इंडियन्स

वेळ : सायं.७.३० वा.


स्थळ : नरेंद्र मोदी स्टेडियम, गुजरात

# मला मुख्यमंत्री व्हायचं आहे

## नाना बोले मोदी है तो मुमकीन है!

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**इच्छा नसतानाही उध्दव ठाकरे यांना मुख्यमंत्री पद मिळाले. स्वत:ला मुख्यमंत्री व्हायचे होते; म्हणून अदृश्य शक्तीच्या बळावर ठाकरेंचे सरकार उलथवून टाकणारे देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्री व्हायचे होते, पण झाले उलटे. मनी असताना पण ध्यानी नसताना एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. संधी असतानाही मुख्यमंत्री पद न मिळाल्याने दीर्घकाळापासून नाराज असणाऱ्या अजितदादांनाही आता मुख्यमंत्री पद हवे आहे. त्यांनी तर 'आत्ताच' मुख्यमंत्री पदावर दावा केला आहे. आता या स्पर्धेत पुण्यातील कसब्याचे काँग्रेस आ. रवींद्र धंगेकर यांनीही उडी मारली आहे. म्हणे त्यांनाही मुख्यमंत्री व्हावेसे वाटत आहे. पण या सर्वांना मुख्यमंत्री करणार कोण? या प्रश्नाचे उत्तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी 'मोदी है तो मुमकीन है' अशा मिश्किल शैलीत 'सूचक' शब्दात सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवर 'अचूक उत्तर दिले आहे.**




गेल्या काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे नेते विधिमंडळातील विरोधी पक्षनेते अजित पवार नॉट रिचेबल झाले आणि त्यांच्या बंडाची चर्चा राज्यात सुरू झाली. ते त्यांच्या समर्थक चाळीस आमदारांना घेऊन पुन्हा एकदा भाजपला पाठिंबा देणार आणि स्वत: मुख्यमंत्री होणार अशी राजकीय अटकळ बांधली गेली. कारण सर्वोच्च न्यायालय सत्तांतर नाट्याचा निकाल देणार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह १६ आमदार अपात्र होणार. त्यातूनच त्यांचे सरकार कोसळणार, त्यावेळी अजितदादा भाजपला मदत करणार, त्याबदल्यात त्यांना मुख्यमंत्री पद मिळणार, अशी चर्चा सुरू झाली. असे काहीच नाही, ही अफवा आहे, असे सांगत शेवटी अजितदादांनीच या चर्चेला पूर्णविराम दिला. या पार्श्वभूमीवर राज्यातील इतर विषय मागे पडले आणि अजितदादांच्या मुख्यमंत्री पदाचीच हवा सुरू झाली. महाविकास आघाडी म्हणून तिन्ही पक्ष एकत्र आहेत, मात्र वैयक्तिक अडचणीमुळे कोणी वेगळा निर्णय घेतला तर त्याबाबत सांगता येत नाही, असे विधान करून महाविकास आघाडीचे कर्तेधर्ते शरद पवार यांनी नवीन पुडी सोडली आणि चर्चेला दुसरे वळण लागले. याच मुद्यावर माध्यमांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांना छेडले असता 'मोदी है तो मुमकिन है' अशा 'सूचक' शब्दात 'अचूक' उत्तर देत नानाभाऊंनी पुन्हा अजितदादांच्या बंडाच्या थंड होत चाललेल्या चर्चेला चालू ठेवण्याचे काम केले आहे.

### नानाभाऊंच्या गंभीरतेवर रवीभाऊंची मिश्किली

दरम्यान, सोमवारी पुण्यातील कसब्याचे काँग्रेस आ. रवींद्र धंगेकर करमाळा दौऱ्यावर आले होते. त्यावेळी माध्यमांनी अजितदादांच्या विधानावरून छेडले असता 'मलाही मुख्यमंत्री व्हावं वाटतंय' असे हसत हसत उत्तर देत मिश्किली साधली. अजितदादांच्या विधानात स्पष्टता होती. त्यावर नानाभाऊंनी गांभीर्याने बोलत भाजपच्या हालचालींकडे बोट दाखवले होते. पण रवीभाऊंनी मिश्किली साधत आलेला प्रश्न आला तसा टोलवला.

### मुख्यमंत्री काँग्रेसचाच होणार

राजकारणात काहीही होऊ शकते. इथे कोणी कोणाचा मित्र नसतो आणि कुणीही शत्रू नसतो. मोदी है तो मुमकीन है. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांकडे आपापले मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आहेत. विधानसभेत ज्या पक्षाला जास्त जागा मिळतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल. काँग्रेसचेच सर्वाधिक आमदार निवडून येणार आणि भविष्यात राज्यात काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार, असा ठाम विश्वासही नानाभाऊ पटोले यांनी व्यक्त केला आहे.

### जेव्हा घ्यायची तेव्हा ठाम भूमिका घ्यावी लागेल

आज आमची आघाडी आहे. एकत्र काम करण्याची आमची इच्छा आहे. पण फक्त इच्छाच नेहमी पुरेशी नसते. जागांचे वाटप आणि त्यात काही अडचणी आहेत की नाहीत यावर अजून चर्चा केलेलीच नाही. कुणी फोडायचं काम करत असेल, त्यांचा तसा काही कार्यक्रम असेल तर ते करत राहतील. आम्हाला जेव्हा यासंदर्भात ठाम भूमिका घ्यायची असेल, तेव्हा ती घ्यावी लागेल, अशा शब्दात भविष्यातील महाविकास आघाडीवर शरद पवारांनी भाष्य केले आहे.

## लऊळ गावातील मांदे वस्तीवर दरोडा; वयोवृद्ध दांपत्य जखमी

✔ **कुर्डूवाडी** : माढा तालुक्यातील लऊळ गावच्या हद्दीतील मांदे वस्तीवर वयोवृद्ध दांपत्यास मारहाण करीत दागिने व रोख रक्कम असे एकूण ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल दरोडेखोरांनी लुटून नेल्याची घटना दि. २३ एप्रिल रोजी, रात्री ११.३० वा. सुमारास घडली.

शशिकला शंकर मांदे (वय -६०) या उन्हाळ्यात घरात उकाडा जाणवत असल्याने त्या घरासमोर झोपले होते. रात्री ११.३० वाजणेच्या सुमारास अनोळखी पाच इसमांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून, काठीसह हाताने मारून या वृद्ध दांपत्यास मारहाण करून जखमी केले. दरोडेखोरांनी महिलेच्या गळ्यातील १ तोळे वजनाचे (५० हजार रुपये) मंगळसूत्र, अर्धा तोळे वजनाचे सोन्याची (२५ हजार) कर्णफुले, दोन्ही पायातील ५० ग्रॅम वजनाची (३ हजार पाचशे) जोडवी असा एकूण ७८ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या दरोडेखोरांच्या झटापटीत ५ दरोडेखोरांपैकी एका दरोडेखोरास वस्तीवर पकडून ठेवले होते. त्या आरोपीस सोमवार दि. २४ एप्रिल रोजी, कुर्डूवाडी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गोपाळ पवार करीत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर बलात्कार; १६ लाखांची फसवणूक; तरुणाविरुद्ध गुन्हा

✔ **सोलापूर** : पतीपासून विभक्त राहणाऱ्या एका महिलेस लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर वेळोवेळी बलात्कार करीत १६ लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याची घटना शहरातील सदर बाजार परिसरात नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात सदर बझारच्या पोलिसांनी राकेश रेवण गायकवाड (वय ३५ रा.सेटलमेंट फ्री कॉलनी, सलगर वस्ती पोलीस ठाण्याजवळ) याच्या विरुद्ध बलात्कार आणि फसवणुकीचा गुन्हा नुकताच दाखल केला आहे.




सोलापुरात राहणारी ती महिला पतीपासून विभक्त झाल्यानंतर मुंबई येथे घरकाम करून राहण्यास होती. दरम्यान ती सोलापुरात वडिलांच्या घरी आली होती . त्यावेळी तिच्या परिचयातील राजेश गायकवाड याच्याबरोबर तिची ओळख झाली. त्यानंतर ती २६ फेब्रुवारी २०१६ रोजी सोलापुरात आली होती. त्यावेळी गायकवाड याने तिला फोन करून अक्कलकोट येथे दर्शनासाठी जाऊ असे म्हणून तिला सात रस्ता येथे बोलावून घेतले होते. त्यानंतर दोघे मोटारीतून जात असताना त्याने अक्कलकोट मार्गावरील एका लॉज येथे नेले. आणि आपण अविवाहित असून तुझ्याशी लग्न करतो, तुझा मरेपर्यंत सांभाळ करतो, असे म्हणत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला.

त्यानंतर त्याने मुंबई (दादर), ठाणे आणि सोलापूर परिसरात तिच्यावर फेब्रुवारी २०२१ पर्यंत शरीर संबध ठेवले. त्याने तिच्याकडून रोख आणि स्वत:च्या बँके खात्यावर वेळोवेळी १६ लाख रुपये मागून घेतले होते. त्यानंतर तो विवाहित असल्याचे निष्पन्न झाले. आपली फसवणूक झाल्याचे समजल्यानंतर तिने पैशाची मागणी केली असता त्याने पैसे देण्यास नकार दिला. असे पीडितेच्या फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस करीत आहेत.

## राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त ११ तालुक्यातील सुंदर गावांची घोषणा

✔ **सोलापूर** : राष्ट्रीय पंचायत राज दिन दि. २४ एप्रिल औचित्य साधून जिल्ह्यातील आर. आर. (आबा) पाटील जिल्हा व तालुका सुंदर गावांची घोषणा राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज केली. नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित एका बैठकीत वडाची वाडी आऊ (ता. माढा) या जिल्हा सुंदर गावासह ११ तालुका सुंदर गावांची घोषणा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे केली. यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे, संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक व पदाधिकारी यांचे अभिनंदन करून अधिक चांगल्या कामांसाठी शुभेच्छा दिल्या. याचे बक्षीसवितरण स्वतंत्र कार्यक्रमाद्वारे करण्यात येणार आहे.



जिल्हा सुंदर गावासाठी रक्कम रू. ४० लाखाचे बक्षीस आहे. तर तालुका सुंदर गावासाठी रक्कम रू. १० लाखाचे बक्षीस आहे. ११ तालुका सुंदर गाव ग्रामपंचायतीचे नाव व तालुका पुढीलप्रमाणे - वागदरी (ता. अक्कलकोट), अंबाबाईची वाडी (ता. बार्शी), खडकी (ता. करमाळा), वडाचीवाडी आऊ (ता. माढा), पुरंदावडे (ता. माळशिरस), लमाणतांडा (बालाजी नगर) (ता. मंगळवेढा), आष्टी (ता. मोहोळ), कौठाळी (ता. उत्तर सोलापूर), तिसंगी (ता. पंढरपूर), वाकी शिवणे (ता. सांगोला), दिंडूर (ता. दक्षिण सोलापूर)

दरम्यान राष्ट्रीय पंचायत पुरस्कार या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारासाठी राज्यातून जिल्ह्यातील ४ ग्रामपंचायतींना नामांकन देण्यात आले आहे. यामध्ये सामाजिकदृष्ट्या सुरक्षित गाव म्हणून अंकलगे (ता. अक्कलकोट), बालस्नेही गाव म्हणून अर्धनारी (ता. मोहोळ), सुशासनयुक्त गाव म्हणून भोसे (ता. पंढरपूर) आणि स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव म्हणून यशवंतनगर (ता. माळशिरस) या गावांना नामांकन देण्यात आल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच, ग्रामपंचायत सक्षमीकरण अभियान अंतर्गत जिल्ह्यातील ६७ गावांची निवड करण्यात आली आहे. सुशासन, आर्थिक सक्षमीकरण आणि ग्रामपंचायत सौंदर्यीकरण या मुद्द्यांवर सदर गावांची निवड करण्यात आली असल्याचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी सांगितले.

## टोल टॅक्स थेट बँक खात्यातून कापला जाणार

✔ **नवी दिल्ली** : केंद्रीय मंत्री गडकरी यांनी वाहनदारकांसाठी एक महत्त्वाची दिली आहे. नवीन टोल नियमही जारी केले जाणार आहेत. येत्या काही दिवसांत टोल वसुलीसाठी दोन पर्याय देण्याचा सरकार विचार करत आहे. आतापर्यंत टोल न भरल्यास शिक्षेची तरतूद नाही, मात्र टोलबाबत विधेयक आणण्याची तयारी सुरू आहे. आता थेट तुमच्या बँक खात्यातून टोल टॅक्स कापला जाणार आहे.

## झोपलेल्या वृद्धाचा मोटारीखाली चेंगरुन मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर

झाडाखाली झोपलेल्या वृद्ध इसमाच्या अंगावरून मोटार गेल्याने ते गंभीर जखमी होऊन मयत झाले. हा अपघात वेळापूर (ता.माळशिरस) येथे घडला.

ज्ञानेश्वर दत्तू उर्फ दत्तात्रय जाधव (वय ७६ रा.साईनाथनगर, वेळापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. काल दुपारी ते घराजवळील रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाखाली झोपले होते. त्यावेळी एमएच४५-एक्यू ४८४८ या क्रमांकाची मोटर त्यांच्या अंगावरून गेल्याने ते जखमी होऊन मयत झाले. या अपघाताची फिर्याद मयताचा मुलगा प्रमोद जाधव यांनी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे वेळापूरच्या पोलिसांनी मोटारीचा चालक रवींद्र बळीराम भोसले (रा.वेळापूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार लिंगडे पुढील तपास करीत आहेत.

## मिरवणुकीत मारहाण; दोघे जखमी

✔ **सोलापूर** : रेल्वे लाईन परिसरातील महापौर बंगल्याजवळ डॉ.आंबेडकर यांच्या मिरवणुकीत किरकोळ कारणावरून झालेल्या मारहाणीत आशिष संतोष कांबळे (वय १७) आणि त्याचा भाऊ राहुल कांबळे (वय २२ दोघे रा.फॉरेस्ट) हे जखमी झाले. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अनोळखी १० ते १५ लोकांनी त्यांना मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



राजकारण आणि वातावरण लैच तापलय

| कल्याण |
| --- |
| 160-71-560 |

| मेन बाजार |
| --- |
| ----- |


# उपग्रह आणि ड्रोनच्या मदतीने जूनपासून ई-पंचनामे

### शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळणार

✔ सुराज्य/सोलापूर

**नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेळेत व्हावेत, पंचनाम्याबद्दल शेतकऱ्यांच्या तक्रारी येऊ नयेत यासाठी येत्या जूनपासनू ई-पंचनामे करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृह आज विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांची एक दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली होती.**

शिंदे म्हणाले की, येणाऱ्या काळात मानवी हस्तक्षेप टाळून माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई -पंचनामा करण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना पारदर्शक पद्धतीने आणि तातडीने मदत मिळावी याकरिता सर्वेक्षणासाठी उपग्रह आणि ड्रोनची मदत घेऊन संगणकीय प्रणाली वापरण्यात येणार आहे. प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना आणण्यात आली आहे. तर प्रधानमंत्री पीक विमा योजनेत आता शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून प्रधानमंत्री पीक विम्याच्या पोर्टलवर नोंदणी करता येणार आहे.



गेल्या काही वर्षांपासून सतत होणारा हवामानाबदल, अवकाळी, गारपीट आणि अवर्षण अशा असंख्य समस्यांनी शेतकरी ग्रासला आहे. शाश्वत शेतीसाठी अनेक उपाय होत असले तरी शेतकऱ्यांना शासनाकडून हक्काच्या मदतीची गरज असते. नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेळेत व्हावेत यासाठी माहिती आधुनिक तंत्रज्ञानाची मदत यावर्षापासून घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमध्ये देण्यात येणाऱ्या मदतीत वाढ करण्यात आली असून आता एसडीआरएफच्या दुप्पट दराने शेतकऱ्यांना मदत करण्यात आली आहे. याशिवाय राज्य आपत्ती प्रतिसाद निधीकडून (एसडीआरएफ) द्यावयाच्या मदतीचे वाढीव दर लागू करण्याबरोबरच आता ३ हेक्टर मर्यादेपर्यंत शेतकऱ्यांना मदत देण्यात येत आहे.आपले शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांना आधार देणे हेच आपले कर्तव्य आहे. जून महिना सुरू झाला की वीज पडून होणारे मृत्यू आणि तीव्र उष्णतेमुळे होणारे मृत्यू हे सर्व टाळण्यासाठी आपण सर्वांनी आवश्यक ती खबरदारी आपल्या विभाग आणि जिल्हयांमध्ये घ्यावी अशा सूचनाही शिंदे यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या काही दिवसात वातावरणात वाढलेली तीव्र उष्णता, गारपीट, अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांचे होत असेलेले नुकसान हे अत्यंत महत्त्वाचे विषया आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये शेतकऱ्यांचे बरेच नुकसान झाले आहे. राज्यातील शेतकऱ्यांना आधार देणे, त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. येणाऱ्या काळातही आपण सर्वांनी दक्ष राहून आवश्यक ती खबरदारी घेऊन आपले काम जबाबदारीने करावे असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. उष्णतेची लाट, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, प्रधानमंत्री कृषी सन्मान योजना २.०, जलयुक्त शिवार, ई-ऑफिस, आकांक्षित शहरे आदी विषयांवर सादरीकरण करण्यात येऊन चर्चा करण्यात येणार आहे.

### मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडून मुख्य सचिव यांचा कार्यगौरव सन्मान

राज्याचे मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव नियत वयोमानानुसार येत्या ३० एप्रिल २०२३ रोजी निवृत्त होत आहे. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिव यांचा कार्यगौरव करीत विशेष सत्कार केला. शासन आणि प्रशासनात दुवा म्हणून काम करत केंद्र शासनाच्या योजना राज्यात गतीशील करण्यासाठी तसेच राज्य शासनाचा कारभार अधिक लोकाभिमुख करण्यासाठी त्यांच्या सहभागासाठी मुख्य सचिव श्रीवास्तव यांचा सत्कार केला.

# केजरींची डोकेदुखी...

एकेकाळी म्हणजेच ऐंशीच्या दशकात जम्मू-काश्मिर आणि पंजाब ही दोनही राज्ये धुमसत होती.कुठे बॉम्बहल्ला तर कुठे गोळीबार अशा बातम्या या दोनही राज्यांमधून भारतीयांच्या कानावर त्याकाळी सतत पडत असत.पंजाबमध्ये खलिस्तानवाद्यांनी तर काश्मिरमध्ये पाकस्थित अतिरेक्यांनी धुमाकूळ चालवलेला होत.पंजाब आज जरी शांत असला तरी काश्मिरमध्ये दहशतवाद्यांची कारस्थाने आजही सुरूच आहेत. त्यात चिंतेची बाब म्हणजे काश्मिरमधील जिहादी तरूण पाकच्या अतिरेक्यांना मदत करत आहेत.पंजाबमधून पुन्हा तीच चिंता समोर आली.खलिस्तानवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे. खलिस्तान समर्थक आणि 'वारीस पंजाब दे' संघटनेचा प्रमुख अमृतपाल सिंग याला पंजाब पोलिसांनी अखेर अटक केली,याचा अर्थ खलिस्तान हा विचार मेला असे कुणी गृहीत धरूच नये.कारण एक अमृतपाल हा बिनभाड्याच्या खोलीत गेला पण त्याचे समर्थक छुप्या मार्गाने कारस्थाने करू शकतात. मार्च महिन्यापासून पोलीस अमृतपालचा शोध घेत होते. १९८४ साली अमृतसरमधील सुवर्ण मंदिरातील कारवाईत मारला गेलेला जर्नेलसिंग भिंद्रनवालेदेखील मूळचा रोडे याच गावातील रहिवासी होता. याच पार्श्वभूमीवर अमृतपालसिंगवर काय आरोप आहेत? मागील काही दिवसांपासून तो का चर्चेत आहे? अटकेच्या काही तास अगोदर अमृतपालने एक व्हिडीओ रेकॉर्ड केला. तो पंजाब सरकार तसेच पंजाब पोलिसांवर टीका करताना त्यात दिसतो. तो या व्हिडीओत पंजाब पोलिसांपासून दूर पळण्याच्या कृतीचे समर्थन करत आहे. तसेच मागील महिन्यात पंजाबमधील



आप सरकारचा खरा चेहरा उघडा पडला आहे, असेही अमृतपालसिंग या व्हिडीओमध्ये म्हणत आहे. खून, अपहरण, खंडणी यांसारख्या अनेक गुन्ह्यांची त्याच्याविरोधात नोंद आहे. अमृतापालसिंग २०२२ साली दुबईतून भारतात आला. तेव्हापासून त्याने पंजाबमधील लोकांना भाषणांच्या माध्यमातून भडकविण्यास सुरुवात केली. लोकांना शस्त्र चालविण्याचेही शिक्षण तो देत होता. अमृतपालसिंग तसेच त्याच्या या कारवायांमुळे पंजाबमध्ये अस्वस्थता पसरली होती. २९ वर्षीय अमृतपालसिंग १९८४ साली अमृतसरमधील सुवर्ण मंदिरातील कारवाईत मारल्या गेलेल्या जर्नेलसिंग भिंद्रनवालेला आपला आदर्श मानतो. तो भिंद्रनवालेसारखेच कपडे परिधान करतो. तसेच भिंद्रवालेसारखेच बोलण्याचा, राहण्याचा आणि वागण्याचा प्रयत्न करतो. भारतातून परतण्याआधी तो जॉर्जिया येथे गेला होता. तेथे भिंद्रनवालेसारखे दिसण्यासाठी त्याने स्वत:वर कॉस्मेटिक सर्जरी करून घेतली म्हणे. शेतकऱ्यांनी पुकारलेल्या कृषी कायद्यांविरोधातील आंदोलनादरम्यान अमृतपालसिंग पहिल्यांदा चर्चेत आला. कृषी कायद्याविरोधातील आंदोलनाचा भाग असलेल्या दीप सिद्धूचा तो समर्थक होता. दीप सिद्धूने २०२१ साली प्रजासत्ताकदिनी लाल किल्ल्यावर निशाण साहीब झेंडा फडकवला होता. याच कारणामुळे सिद्धू चर्चेत आला होता. या काळात अमृतपालसिंग दुबईमध्ये राहायचा. येथे तो आपल्या कुटुंबाचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय सांभाळायचा. अमृतपालसिंगचे कुटुंबीय अमृतसरमधील जल्लूपूर येथील रहिवासी आहेत. फेब्रुवारी २०२२ मध्ये दीप सिद्धू याचा अपघातात मृत्यू झाला. या घटनेच्या काही महिन्यांनंतर म्हणजेच सप्टेंबर २०२२ मध्ये अमृतपालसिंग दुबईतून भारतात परतला. त्यानंतर दीप सिद्धू याच्या वारीस पंजाब दे या संघटनेचा तो प्रमुख झाला. भिंद्रनवाले याच्या रोडे या गावातच दीप सिद्धू याने या संघटनेचे प्रमुखपद स्वीकारले. या वेळी त्याने आपल्या भाषणादरम्यन खलिस्तान झिंदाबाद, अशा घोषणा दिल्या होत्या.रोडे येथील भाषणात बोलताना, आपण सर्व पंजाबी लोक अजूनही गुलाम आहोत. जे स्वत:ला स्वंतत्र असल्याचे समजतात त्यांनी डॉक्टरांकडे जाऊन स्वत:वर उपचार करून घ्यावेत. आपल्या हक्काचे पाणी पळवले जात आहे. आपल्या गुरूंचा अनादर केला जात आहे. अशा घटनांमध्ये जे लोक सहभागी असतील, त्यांना आम्ही पोलीस किंवा न्यायालयाकडे सुपूर्द करणार नाही. आम्हीच त्यांना शिक्षा देऊ, असे अमृतपालसिंग म्हणाला होता.अमृतपालचा वापर राजकीय उद्दे काढण्यासाठी केला जात आहे की काय हेही तपासण्याची गरज आहे.कारण अमरिंदसिंग यांची सत्ता असताना खलिस्तानवाद्यांचा कुठेही लवलेश नव्हता. आम आदमी पक्षाचे सरकार आल्यानंतर अमृतपाल कसा तयार झाला हाही संशोधनाचा विषय आहे.अमृतपाल केजरींचा पक्षासाठी डोकेदुखी ठरेल,असे वाटते. आगामी काळात अमृतपालसिंगवर काय कारवाई केली जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

सामाजिक

# भारतीय वस्त्रोद्योगाची जगभरात मुद्रा

**एव्हाना परदेशी बाजारपेठेत भारतीय कापड उद्योग भाव खाऊ लागला आहे. पीएम मित्रा योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या हबमध्ये सूत विणणे, डाईंग, फॅब्रिक प्रिंटिंग, शिलाई या प्रक्रिया एकाच ठिकाणी पार पडत असल्यामुळे लॉजिस्टिक खर्चात लक्षणीय घट होईल. मूल्य साखळीचे एकाच ठिकाणी एकत्रीकरण केल्याने खर्चात लक्षणीय घट होईल. यामुळे भारतीय पोशाख जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक होऊ शकतील.**

पुरेसा कच्चा माल आणि मोठ्या श्रमशक्तिसह भारत जागतिक रेडिमेड कपड्यांच्या बाजारपेठेत मक्तेदारी निर्माण करण्यास तयार आहे. केअरएज' या रेटिंग एजन्सीने एका अहवालात म्हटले आहे की, २०२७ पर्यंत तयार भारतीय कपड्यांची निर्यात ३० अब्ज डॉलरपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे. जागतिक निर्यातीत भारतातील कापड उद्योगाचा वाटा पाच टक्के आहे. फायबरपासून फॅब्रिकपर्यंत कापूस, कापड मूल्य शृंखलेत भारताची उपस्थिती मजबूत आहे. मानवनिर्मित फायबरमध्ये आपण थोडे मागे आहोत. भारतातील देशांतर्गत पोशाख आणि कापड उद्योग देशाच्या जीडीपीमध्ये दोन टक्के आणि मूल्याच्या दृष्टीने उद्योग उत्पादनात सात टक्के योगदान देतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फाईव्ह एफ फॉर्म्युला भारताला समृद्ध करणारा आहे. त्यासाठी त्यांनी फार्म, फायबर, फॅक्टरी, फॅशन आणि फॉरेनला फाईव्ह एफचा फॉर्म्युला दिला आहे. त्यांनी आधुनिक प्लग अँड प्ले इंटिग्रेटेड इन्फ्रास्ट्रक्चरची कल्पना मांडली आहे. त्यामुळे वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना मिळेल आणि भारतातील वस्त्रोद्योग क्षेत्र दुप्पट आणि निर्यात तिप्पट होण्यास मदत होईल. दोन वर्षांपूर्वीपर्यंत वस्त्रोद्योग क्षेत्राची निर्यात ३३ अब्ज डॉलरपर्यंत होती. २०३० पर्यंत ती १०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे. २०२१ मध्ये देशांतर्गत कापड आणि पोशाख उद्योग १५२ अब्ज डॉलर इतका असण्याचा अंदाज होता. त्यात वाढ होऊन २०२५ पर्यंत २२५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल. कृषी क्षेत्रानंतर दुसरा सर्वात मोठा रोजगार देणारा भारतातील कापड आणि परिधान उद्योग फायबर, सूत, फॅब्रिकपासून कपड्यांपर्यंतच्या संपूर्ण मूल्य शृंखलेत सामर्थ्यवान आहे.

भारत हा जगातील सर्वात मोठा ग्राहक आणि कापूस उत्पादक देश आहे. पॉलिस्टर, सिल्क आणि फायबरमध्ये आपण दुसऱ्या क्रमांकाचे मोठे उत्पादक आहोत. शेतीपाठोपाठ रोजगारनिर्मिती करणारे हे दुसरे सर्वात मोठे क्षेत्र आहे. ते थेट ४५ दशलक्ष लोकांना आणि संलग्न उद्योगांमध्ये १०० दशलक्ष लोकांना रोजगार देते. पारंपरिक हातमाग, हस्तकला, लोकर आणि रेशीम उत्पादने ते भारतातील संघटित वस्त्रोद्योग यांसारख्या क्षेत्रांच्या विस्तृत श्रेणीसह भारतीय वस्त्र आणि वस्त्र उद्योग अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. भारतातील संघटित वस्त्रोद्योग कापड उत्पादनांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी भांडवल आणि तंत्रज्ञानाचा उत्तम वापर करते. यामध्ये कताई, विणकाम, प्रक्रिया आणि कपड्यांचे उत्पादन समाविष्ट आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा रेशीम उत्पादक देश आहे आणि हाताने विणलेले जगातील ९५ टक्के कापड भारतात तयार होते.

२०१९-२० मध्ये देशांतर्गत वस्त्रोद्योग आणि वस्त्र उद्योगाची



उलाढाल १५०.५ अब्ज डॉलर आहे. जपान, मॉरिशस, इटली आणि बेल्जियम या देशांनी एप्रिल २०१६ ते मार्च २०२१ या कालावधीत भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्रात (डायड, प्रिंटेडसह) एफडीआयमध्ये सर्वाधिक योगदान दिले. २०१९-२० आणि २०२०-२१ मधील समान आकडेवारीची तुलना करता भारताने हस्तशिल्पांसह वस्त्रोद्योग आणि परिधान करावयाच्या कपड्यांमध्ये आतापर्यंतची सर्वोच्च निर्यात पातळी ४४.४ अब्ज डॉलर इतकी वाढवली आहे. एकूण निर्यातीपैकी एकट्या अमेरिकेला २७ टक्के निर्यात होते. त्यानंतर युरोपियन महासंघ (१८ टक्के), बांगलादेश (१२ टक्के) आणि संयुक्त अरब अमिराती (सहा टक्के) यांचा क्रमांक लागतो. हस्तशिल्पांची निर्यात वगळल्यास, ऑक्टोबर २०२२ मध्ये सर्व कापडांची निर्यात ९८८.७२ दशलक्ष डॉलर आणि त्याच कालावधीत हस्तनिर्मित कार्पेट्सची निर्यात ९८.०५ दशलक्ष डॉलर होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये सुती धागे/फॅब्स/मेडअप्स, हातमाग उत्पादने इत्यादींचे निर्यात मूल्य ७१९.०३ दशलक्ष डॉलर इतके होते.

भारतातील कापड आणि वस्त्र उद्योगाशी संबंधित एकूण १,७७,८२५ विणकर आणि कारागीर गव्हर्मेंट-ई-मार्केटप्लेस'वर नोंदणीकृत आहेत. देशात पोशाख, फॅब्रिक आणि तांत्रिक वस्त्र उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने १० हजार ६८३ कोटी रुपयांची उत्पादन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजना सुरू केली आहे; जेणेकरून वस्त्रोद्योगाचा आकार वाढावा. याशिवाय महाराष्ट्र, अहमदाबाद, दिल्ली आणि चेन्नई या महानगरांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स कार्यरत आहे. म्हणूनच येत्या काळात परदेशात भारतीय कपड्यांचा डंका वाजणार आहे. या क्षेत्रात लाखो लोकांना रोजगारही मिळेल आणि प्रगतीचे नवे मार्ग खुले होतील. मोदी सरकारने देशातील सात राज्यांमध्ये पीएम मित्रा मेगा टेक्स्टाईल पार्कला मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे देशात १४ लाखांहून अधिक नवीन रोजगारसंधी निर्माण होणार आहेत. या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे यात कपड्यांचे सर्व काम एकाच ठिकाणी असणार आहे. शासनाच्या या मेगा इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क'मधून कपड्यांच्या निर्मितीपासून त्यांचे मार्केटिंग, डिझायनिंग आणि निर्यातीपर्यंत सर्व काही एकाच ठिकाणाहून शक्य होणार आहे.पीएम मित्रा' मेगा टेक्स्टाईल पार्क फाईव्ह एफ (फार्म टू फायबर टू फॅक्टरी टू फॅशन टू फॉरेन) व्हिजनच्या आनुषंगाने वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना देईल. तामिळनाडू, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये पंतप्रधान मित्र मेगा टेक्स्टाईल पार्क्सची स्थापना केली जाईल.

केंद्रीय मंत्रिमंडळाने वस्त्रोद्योगासाठी मित्रा योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत पुढील पाच वर्षांमध्ये एकूण ४,४४५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. ही टेक्स्टाईल पार्क्स सरकार-खासगी भागीदारी मॉडेलवर विकसित केली जाणार आहेत. मेक इन इंडिया' आणि मेक फॉर द वर्ल्ड'चे हे उत्तम उदाहरण असेल. वस्त्रोद्योग मंत्रालय ७ मेगा इंटिग्रेटेड टेक्स्टाइल सेक्टर आणि परिधान (पीएम मित्र) पार्क उभारणार आहे. या मेगा प्रोजेक्टमुळे वस्त्रोद्योगात तेजी येणार आहे. यामध्ये कपड्यांच्या डिझायनिंगपासून मार्केटिंग आणि एक्सपोर्टपर्यंत सर्व काही एकाच ठिकाणी असेल. सध्या भारत हा जगातील सहाव्या क्रमांकाचा वस्त्र निर्यातदार देश आहे. भारतीय वस्त्र निर्यातदारांना फायदा होईल.

**- प्रा. नंदकुमार गोरे**

टुडेज् ब्लॉग

# मोठी लोकसंख्या : संकट की आव्हान?

अभिनंदन! आपण लोकसंख्येच्या बाबतीत महासत्ता बनलो आहोत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकसंख्या निधी (यूएनएफपीआय)च्या ताज्या आकडेवारीनुसार भारताने चीनला २१ लाखांनी मागे टाकत जगात सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून प्रथम क्रमांक पटकावला आहे. भारताची लोकसंख्या १४२ कोटी ८६ लाख झाली आहे. म्हणजे कोणत्या तरी क्षेत्रात आपण महासत्ता झालो आहोत, पण आता आपली जबाबदारीही वाढली आहे. या लोकसंख्येचा वापर कशा रितीने करून आता आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करण्याचे धोरण आतापासूनच आपण आखले पाहिजे. लोकसंख्या जास्त असण्याचे फायदे असतात, तसे तोटेही असतात. लोकसंख्या वाढीचे काही लाभ निश्चित आहेतच. फायदा एक असतो, तो म्हणजेच एखादी मोठी बाजारपेठ घरातच उपलब्ध होणार आहे. जनतेची क्रयशक्ति अर्थकारणाला ऊर्जितावस्थेत ठेवत असते आणि या चक्राभोवती फिरणारी इतर चक्रे म्हणजे रोजगार निर्मिती. घरे, बांधकाम व्यवसाय, पायाभूत सुविधा आणि या सर्वांवर होणारी गुंतवणूक. या वाढत्या लोकसंख्येला आज घर, पाणी, वीज, अन्नधान्य, आरोग्य आदी मूलभूत सुविधा पुरवण्याचे मोठे आव्हान उभे राहणार आहे. जर यातील उत्पन्न किंवा अन्य बाबींमध्ये तफावत निर्माण झाली तर गरीब- श्रीमंतांमधील दरी अधिकच वाढत जाणार आहे. अधिक लोकसंख्या म्हणजे देश



उभारण्यासाठी जेवढे हात अधिक तेवढेच खाणारी तोंडे व त्यांच्यासाठी केलेल्या परिपूर्णतेचे प्रयत्न हेही मोठ्या संकटाला आव्हान देणारे असेल.

भारत हा सर्वात तरुण देश आहे आणि तो लोकसंख्येचा परिपाक असल्याने लोकसंख्या वाढ ही देशासाठी लाभदायक असल्याची मांडणी होत आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी २५ वर्षांवरील वय असलेल्या तरुणांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्याआधारे जगात कोणत्याच देशाकडे नाही, एवढे मोठे कार्यक्षम मनुष्यबळ भारताकडे आहे. त्याआधारेच आपली आर्थिक भरभराट होईल, असा युक्तिवाद करण्यात येतो. भारताकडे युवा मनुष्यबळ आहे हे नक्की. विकसनशील देशांमध्ये युवकांची संख्या जास्त असेल तर तेथील अर्थव्यवस्थेसाठी ती चांगली बाब असते. त्यासाठी आपल्याला शिक्षण व आरोग्य या बाबींमध्ये मोठी गुंतवणूक करावी लागणार आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर लोकसंख्या ही समस्या न राहता वरदान ठरेल, हे सुद्धा आपण पाहिले पाहिजे.

पण मर्यादित स्वरूपात व दीर्घकालीन विचार करता वाढती लोकसंख्या ही धोकादायकच आहे. लोकसंख्येचा हा स्फोट पाहता देशातील मोठ्या वर्गापर्यंत आजच संसाधनांची कमतरता भासू लागली आहे. त्यांना अजूनही मूलभूत सुविधा मिळू शकत नाही. देशाच्या अनेक भागांत आतापासूनच जलसंकट भेडसावू लागले आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येचा ताण हा तापमानवाढ व पर्यावरणातील होणारे बदल भविष्यात खूप मोठी उलथापालथ घडवून आणणार आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येचा परिणाम हा आतापासूनच आरोग्यसेवेवरही होऊ लागला आहे. वाढती लोकसंख्या ही गौरवण्याची गोष्ट निश्चितच नाही. आज संपूर्ण जगासाठीच लोकसंख्या वाढ ही चिंतेची बाब आहे. कारण पृथ्वीवर साधने व साधनसंपत्ती मर्यादित आहे. मात्र तिचा उपभोग घेणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. लोकसंख्या वाढीचा ताण हा अन्नधान्यापासून नैसर्गिक साधनसंपत्तीवर येत असल्याने भविष्यात लोकसंख्या वाढीचा तोटाच जगाला सहन करावा लागणार आहे. भारतालाही त्याची किंमत चुकवावी लागणार आहे. लोकांना अन्न पुरवण्याचे सगळ्यात मोठे आव्हान जगासमोर असणार आहे. भारतासारख्या देशाला लोकसंख्या वाढीबाबत अनेक सामाजिक प्रश्नांचा सामना करावा लागू शकतो. म्हणूनच आता ग्रामीण भागातील रोजगार कशा पद्धतीने निर्माण होतील, हेही पाहिले पाहिजे. नाहीतर लोंढेच्या लोंढे शहरांकडे येऊन शहरे बकाल होतील व गावे ओसाड पडतील. गावाकडे राहून शेतीवाडी करून त्या शेतातून दुप्पट उत्पन्न कसे घेता येईल, यावर जास्त संशोधन झाले पाहिजे, तरच ही एक मोठी समस्या आपण सोडवू शकू. तसेच सामाजिक समतोलही निर्माण होईल.

**- अल्पेश म्हात्रे**

## येई रूद्रा...

भक्तांचे, सज्जनांचे रक्षण आणि दुष्टांचे, राक्षसी वृत्तीचे निर्दालन देव-देवतांनी केल्याचे पुराणे सांगतात. 'जे का रंजले गांजले' असतील, त्यांना आपुलकीने वागविणारा समाज असावा, हे त्यातून सांगायचे असावे. तो नीतिमानांचा, सहृदयी मंडळींचा असावा, दुष्ट प्रवृत्तींना तेथे थारा असू नये, असेच पुराणकथांतून सांगितलेले असते. शिवमहादेव रौद्ररूप धारण करून, राक्षसी वृत्तींच्यांचा संहार करणारा म्हणून ख्यात आहे. याच्या अनेक संहारमूर्ती हेच दर्शवितात. अंधकासूरवध, गजासूर संहार, त्रिपुरांतक, कालारिशिव या मूर्ती त्याने राक्षसी वृत्तीचा, समाजासाठी अवांछितांचा नाश कसा व का केला, हे सांगतात. शिवाच्या अशा मूर्ती भारतभर मोठ्या संख्येने आढळतात. यातील काही मंदिरांच्या बाह्यभिंतीतील देवकोष्ठात असतात; त्यामुळे गाभाऱ्यातील देवतेचा परिचय होतो. ब्रह्मदेवांनी राक्षसांना वर द्यावा आणि ते बेबंध झाले, की शिवाकडे धाव घ्यावी. शिवाने त्यांचे पारिपत्य करावे, असे दिसते.

काशी येथे यज्ञकर्मात अडथळे आणणाऱ्या गजासुराने छळ मांडला, तेव्हा 'प्रथेप्रमाणे' सगळ्या देवांनी शिवाला विनंती केली, 'डमडमत डमरू ये, शंख फुंकित ये, येई रुद्रा.' या खेपेस सगळ्या देवांनी त्यांच्या शक्ति साह्यासाठी द्याव्यात, असे शिवाने सुनावले. या घटनेचे प्रत्यंतर कैलास लेणीतील गजासूर संहार मूर्तीत आढळते.

त्रिपुरांतक शिवमूर्ती दुर्मीळ आहेत. महाभारतातील कथेप्रमाणे तारकासुराच्या विद्युन्माली, तारकाक्ष आणि कमलाक्ष या तीन मुलांनी ब्रह्मदेवाकडून तीन किल्ले तपश्चर्येने मिळवले. ते एक हजार वर्षांत एकदा एका बिंदूवर काही काळ स्थिरावतील. एकाच बाणात त्या तिन्हींचा विध्वंस होऊ शकेल, असा वर मिळाल्यावर ते देवांना छळू लागले. शेवटी शिवाने संधी साधून, ते एका बिंदूवर येताच, एका बाणाने उडवले आणि देवांना अभय दिले. कैलास लेणीत हे यथास्थित कोरले आहे. मांढळ (जि. नागपूर) येथील उत्खननात इ. स. पाचव्या शतकातील त्रिपुरांतक शिवाची फार सुंदर मूर्ती मिळाली आहे.

शिवाच्या कालारिमूर्ती, अंधकारसूर वधाच्या मूर्तीद्वारेही अनीती, दुष्टपणा, भक्तसंरक्षण यासंबंधीची कल्पना दिली गेली. त्यासाठी पीडित भक्तांनी 'येई रुद्रा' अशी आराधना करायला हवी.

जनमानस

## डोकं सुन्न झालं आहे...

जेसीपी ही कमिटी संसदीय पातळीवर असली तरी अत्यंत बारकावे जपणारी, खोलात जाणारी, ग्रासरुटला अभ्यास करून अहवाल देणारी नामवंत अशी अत्यंत महत्त्वाची संसदीय पातळीवरची कमिटी आहे. परंतु अशा जेसीपीकडून चौकशी करणं, बारकावे समजून संसदेला रिपोर्ट सादर करणं हे पवार साहेबांना संसदीय परंपरेला धरून वाटलं नाही. म्हणून स्व. चव्हाण साहेबांच्या, वसंतदादांच्या सावलीत वाढलेल्या आदरणीय पवार साहेबांनी या संसदेला मनापासून विरोध केला. त्यामुळे खा. राऊतांच्या पोटात अल्सर पैदा झाला आणि तो विरोधकांच्या दुर्देवाने सर्वपक्षीय सुपारीबाज खा. राऊतांना चेहऱ्यावर लपवता आला नाही. त्यामुळे खासदार खुपच चिंतेत वाटतात. कारण चोवीस वर्षाचा संसदेचा दरबारी थाट जो चेहऱ्यावर विलसत असतो. तर अनेक पक्षाचा करिष्मा चेहऱ्यावर सतत तेज बहाल करीत असतो. परंतु अलीकडे खा. राऊत बंधू सत्तेची सगळी रसद बंद झाल्यामुळे अधीकच चिंतेत असतात.

१९८५ साली काँग्रेस दरबारात ४१३ खासदार उपलब्ध होते. काँग्रसेचा मोठा दबदबा होता. स्व. इंदिराजींच्या हत्येनंतर संसदेचे काँग्रस बळ वाढले होते. त्यामुळे संसदेत काँग्रेस निर्विवाद बहुमताची झालर पांघरून अलिशान साम्राज्याचा मुकूट घालून मिरवत होती. अशावेळी एका राजाने काँग्रेसची साथ सोडली आणि व्ही.पी.सिंगांनी तोफगोळा डागला. तोफगोळ्यात मोठा घोटाळा झालाय हे पुराव्यानीशी ठामपणाने जगासमोर आणले. तेंव्हा प्रधानमंत्री राजीवजींनाही जेसीपी कमिटीची चौकशी मान्य करावी लागली. शेवटी त्यात काही फारसं निघालं नाही. या धर्तीवरच सभागृहातले जेष्ठ जाणते नेते म्हणून पवार साहेबांनी जेसीपी कमिटी मार्फत चौकशी या संसदीय प्रस्तावाला कडाडून विरोध केला. महाविकास आघाडीमधल्या अतिशय जिव्हाळ्याच्या जवळच्या सहकाऱ्यांना न जुमानता भाजपबद्दलची आपली ठाम भूमिका लोकांपुढे मांडली. पत्रकारांनाही खुल्या दिलानं सांगितली. परंतु जितेंद्र आव्हाड, भास्करराव जाधव, अरविंद सावंत, विनायक राऊत, संजय राऊत, आदित्य ठाकरे उत्स्फूर्तपणे ओरडणारी, न सांगता, न वाचता छाती बडवणारी असे दहा आमदार असून यावर खा. संजय राऊतांचे आणि विरोधी पक्षनेते एकनाथ खडसेंचे देशाला उद्देशून मार्गदर्शन असते. तर कधीकधी अजितदादा स्वयंघोषित प्रवक्ता म्हणून यावर भाष्य करीत असतात. हे एकून रोज मतदारांचं डोकं सुन्न झालं आहे, गोंधळून गेलं आहे. काहीच कळत नाही अशी द्विधा अवस्था झाली आहे. तरी नाईलाजास्तव काहीवेळेला सगळ्यांचेच ऐकावे लागते.

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे, माजी मंत्री**

# नवे आर्थिक वर्ष आणि करनियोजन

***नवे आर्थिक वर्ष १ एप्रिल रोजी सुरू झाले. आयकरासंदर्भात महत्त्वाचे बदल या वर्षांपासून झाले असून ते लक्षात घेऊनच कर नियोजन करायला हवे. तीन वर्षांपूर्वी नवीन करप्रणाली ऐच्छिकरीत्या लागू झाली ती आता आपली मुख्य करप्रणाली बनली असून जुनी करप्रणाली ऐच्छिक झाली आहे. जुन्या प्रणालीतील तरतुदी तशाच असल्या तरी त्यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. यातील बरेचसे बदल नवीन करप्रणालीच्या संदर्भात असून आता ती अधिक आकर्षित बनवली आहे. त्यामुळे अधिकाधिक करदाते तिच्याकडे आकृष्ट होतील. भविष्यात ती अधिक आकर्षित करून ज्यावेळी फार थोड्या करदात्यांच्या ती फायद्याची असेल, तेव्हा कदाचित ती बंद केली जाईल. यात गृहकर्जावरील व्याज, शैक्षणिक कर्जाचे व्याज, घरभाडे भत्ता, घरभाड्यास मिळणारी प्रमाणित वजावट अशा अनेक दुखऱ्या नसा असून त्यावर टप्प्याटप्प्याने मार्ग काढला जाईल.***

गेल्या आर्थिक वर्षापर्यंत ऐच्छिकरीत्या अस्तित्वात असलेली करप्रणाली, फारशी लाभदायक नसल्याने ती स्वीकारू नये असा सरसकट सल्ला देता येत होता. आता प्रत्यक्षात दोन्ही पद्धतीने करदेयता तपासून कोणती करप्रणाली आपल्याला योग्य होईल हे स्वतः अथवा जाणकार व्यक्तींची मदत घेऊन करदात्यास योग्य तो पर्याय निवडावा लागेल अन्यथा नवीन करप्रणाली त्यास मान्य आहे, असे समजण्यात येईल. त्यामुळेच करदात्यांना अधिक सावध राहायला हवे.



ज्यांचे निव्वळ उत्पन्न सात लाख पन्नास हजारांच्या आत आहे. त्या सर्वांना नवीन करप्रणाली स्वीकारली तरी कोणतीही गुंतवणूक न करता किंवा जुन्या प्रणाली प्रमाणे ८०सी प्रकारात खालील जास्तीत जास्त दोन लाख रुपये गुंतवून कोणताही कर द्यावा लागणार नाही हे यातील साम्य आहे. या उत्पन्न गटातील अनेक लोक कर कपात टाळण्यासाठी अशी गुंतवणूक करण्याचा प्रयत्न शेवटच्या क्षणांपर्यंत करत असत. आता या लोकांना कोणतीही गुंतवणूक न करता कर द्यावा लागणार नाही. यामुळे या वर्गातील लोकांकडे खर्च करण्यासाठी अधिक रक्कम उपलब्ध असेल. त्यामुळे यातील काही लोक तरी गुंतवणूक टाळतील किंवा अधिक गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करणार नाही. यांचे उत्पन्न सात लाख रुपयांहून अधिक असेल त्यांना पंचवीस हजार अधिक वाढीव उत्पन्नावरील १५% दराने कर द्यावा न लागता फक्त वाढलेल्या उत्पन्नाच्या एवढा किंवा प्रत्यक्षातील कर यातील किमान रक्कम कर म्हणून द्यावी लागेल याचा फायदा ज्यांचे करपात्र उत्पन्न सात लाख तीस हजारांच्या आसपास असेल त्या सर्व करदात्यांना होईल.

खरं तर अडचणीच्या काळातील आकस्मिक खर्चाची पूर्तता या गुंतवणुकीतून केली जात होती. त्यामुळे आपल्याला करात सवलत मिळो अथवा न मिळो या पलीकडे जाऊन शक्यतो जास्तीत जास्त गुंतवणूक या वर्गातील लोकांनी करायला हवी. अन्यथा काही गंभीर प्रसंग ओढवला तर कोणाकडे तरी हात पसरावे लागतील. ही समस्या जास्त उत्पन्न असलेल्या लोकांना नाही कारण त्यांच्या दृष्टीने अशी समस्याच नाही. तेव्हा जरी तुम्ही नवीन करप्रणाली स्वीकारली तरी भविष्याची गरज या एकमेव हेतूने जास्तीत जास्त गुंतवणूक करावी असे माझे मत आहे. जे लोक यावर्षी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त होत आहेत त्यांना मिळणाऱ्या संचित रजेच्या प्रतिपूर्तीची करमुक्त रक्कम तीन लाखांहून पंचवीस लाखांवर नेल्याने अशा लोकांची करदेयता मोठ्या प्रमाणात कमी होईल यासंदर्भात सरकारकडून लवकरच परिपत्रक निघेल अशी अपेक्षा आहे. याचा फायदा सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना होईल.

दागिन्यांचे डिजिटल सोन्यात रूपांतर करताना किंवा डिजिटल सोन्याचे धातू रूपातील सोन्यात रूपांतर करताना होणाऱ्या भांडवली नफ्यावर अल्प अथवा दीर्घ मुदतीचा भांडवली नफा होतो. आजपर्यंत यातील मुदत पूर्ण झालेले सुवर्ण सार्वभौम रोखे (एसजीबी) आजपर्यंत करमुक्त होते, आता कोणत्याही प्रकारची आदलाबदली पूर्णपणे करमुक्त झाल्याचा लाभ सर्वानाच होईल. ज्येष्ठ नागरिक बचत योजनेतील (एससीएसएस-२०१९) गुंतवणूक मर्यादा पंधरा लाखांवरून तीस लाखपर्यंत वाढवली असून यावर मिळणारा प्रचलित व्याजदर ८.२% प्रतिवर्षं केल्याने त्याचे जीवन थोडे सुसह्य होऊ शकते. पति-पत्नी प्रत्येकी तीस लाख रुपये या खात्यांमध्ये टाकू शकतील. याबाबत अर्थ मंत्रालयाकडून परिपत्रक निघाले असून सरकारच्याच पोस्ट खात्यास ते अजून मिळालेले नाही, लवकरच ते मिळेल अशी अपेक्षा आहे. गेली अनेक वर्षे यावरील मिळणारे व्याज खूपच कमी होते त्यामानाने चालू दर कालानुरूप वाटतात. कमी व्याजदराचे पूर्वीचे खाते दंड भरून बंद करून वाढीव व्याजदराचा फायदा यापूर्वीचे खातेदार घेऊ शकतात. सर्व गोष्टी लक्षात ठेवून करनियोजन करावे, काही शंका असल्यास तज्ज्ञ व्यक्तींचा सल्ला जरूर घ्यावा.

**- उदय पिंगळे**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# डाळिंब क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्नशील : कुमार

## डाळिंब पीक धोरण कार्यशाळा उत्साहात

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्हा हा डाळिंब पिकाचे आगार असणारा जिल्हा आहे. भारतातून डाळिंब निर्यातीत या जिल्ह्याचा मोलाचा वाटा आहे. परंतु काही वर्षापासून प्रतिकूल नैसर्गिक बदलांमुळे, रोग व कीड प्रादुर्भावामुळे, तसेच निश्चित भाव नसल्याने डाळिंब लागवड कमी झाली आहे. या अनुषंगाने डाळिंब पीक उत्पादकांच्या अडचणी सोडवण्यासाठी डाळिंब पीक धोरण कार्यशाळा उपयोगी ठरेल. डाळिंबाचे कमी झालेले क्षेत्र वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राज्याचे सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव तथा तथा मॅग्नेट सोसायटीचे अध्यक्ष अनुप कुमार यांनी व्यक्त केला.**




डाळिंब पिकाची लागवड वाढण्यासाठी महाराष्ट्र ॲग्रीबिझिनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या क्षमता विकास घटकांतर्गत आयोजित डाळिंब पीक धोरण कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शिवछत्रपती रंगभवन सभागृह येथे आयोजित या कार्यक्रमास मॅग्नेट प्रकल्पाचे अतिरीक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, विभागीय प्रकल्प उपसंचालक राजेंद्र महाजन, प्रकल्प उपसंचालक नितीन पाटील, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ग्रो बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प व फार्म डी एस एस ॲग्रोटेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे संचालक राजीव मराठे यांनी डाळिंब लागवडीचे क्षेत्र कमी झाल्याची कारणे व लागवडीचे क्षेत्र वाढण्यासाठी काय प्रयत्न करणे आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये फार्म डी एस एस ॲग्रोटेक प्रा. लि. चे संस्थापक डाळिंबरत्न बी. टी. गोरे यांनी उत्तम कृषि पध्दती वापरून डाळिंबाच्या शेती आधुनिक कशी करता येईल, यासंदर्भात मार्गदर्शन केले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरच्या प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जोत्स्ना शर्मा यांनी डाळिंब पीक संरक्षण, डाळिंबावरील विविध रोग व त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध भागातून ५०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी तसेच महिला डाळिंब उत्पादकांनी उपस्थिती दर्शविली.



## म. बसवेश्वर जयंती वडवळ येथे साजरी

**सोलापूर :** श्रीक्षेत्र वडवळ येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन श्रीश्रीश्री १०८ माढेकर महाराज यांच्या हस्ते व खर्गे महाराज पोपटमहाराज शिवपुजे व आकाशमहाराज शिवपुजे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी श्रीक्षेत्र वडवळ गावचे सरपंच जालिंदर बनसोडे, ग्रामपंचायत सदस्य राहुल मोरे, नागनाथ देवस्थान पंच कमिटींचे चेअरमन श्रीकांत शिवपुजे,भीमा सहकारी साखर कारखान्याची माजी संचालक सुरेश आप्पा शिवपुजे, अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष शाहू धनवे, लिंगायत महासंघाचे मोहोळ तालुका उपाध्यक्ष शिवकुमार शिवपुजे ,श्री थिटे गुरुजी देगाव, शाहु शिवपुजे, संतोष शिवपुजे, शशिकांत शिवपुजे, लखन लेंगरे, नानासाहेब शिवपुजे, प्रकाश नडमने,प्रा. सुशांत मोरे पोपट व्यवहारे ,आप्पासाहेब नडमने,नेमींनाथ पडवळकर भिमराव मोरे पाटील व बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते, यावेळी बोलताना श्री माढेकर महाराजांनी ज्याप्रमाणे महात्मा बसवेश्वर महाराजांनी सर्व जाती ,धर्म, पंथ यांना एकत्र करून जुन्या रूढी परंपरांचा त्याग केला.सर्व मानव जातींमध्ये एकता निर्माण करण्यासाठी कार्य केले तसेच कार्य आपण सर्वांनीही करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राजाराम बाबर यांनी व आभार श्री लखन लेंगरे यांनी मानले.

## सांगोला-पंढरपूरसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करा : कदम

**सांगोला :** दुचाकी व चार चाकी वाहन चालकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन सांगोला- पंढरपूरसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याची मागणी किसान आर्मीचे प्रफुल्ल कदम यांनी राज्य शासनाला केलेली आहे.

सध्या सांगोल्यासाठी अकलूजला तर पंढरपूर साठी सोलापूरला उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आहे. गाडीचे फिटनेस सर्टिफिकेट, पासिंग,विविध प्रकारची परवाने, रजिस्ट्रेशन, ई रजिस्ट्रेशन, मॉडिफिकेशन आदी कामासाठी दूर अकलूजला अथवा सोलापूरला जाणे लोकांना खूपच खर्चिक व अडचणीचे झाले आहे.सांगोला तालुक्यातील लोकांना तर विनाकारण शंभर किलोमीटर दूर केवळ आरटीओ कामासाठी अकलूजला जावे लागते. त्या ठिकाणी एक दिवसात काम होईल याची शाश्वती नसते त्यामुळे आरटीओ कामे करणे कटकटीचे, खर्चिक व वेळ काढू झाले आहे. त्यामुळे अनेक लोकांना इच्छा असूनही परवाने काढणे राहून जात आहे. या सर्व बाबींचा विचार करून सांगोला-पंढरपूरसाठी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करावे अशी मागणी केली आहे

## उत्तर तालुक्यासाठी अप्पर तहसील कार्यालय करा : कदम

**उ. सोलापूर :** उत्तर तालुक्यातील समस्या सोडवण्यासाठी अप्पर तहसील कार्यालयची स्थापना करावी अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना भाजप उत्तर तालुकाध्यक्ष काशिनाथ कदम यांनी केली आहे.

उत्तर तालुक्यातील प्रलंबित प्रश्न, त्यावरील उपाय योजना, जनतेच्या प्रश्नाची होणारी अडवणूक या सर्व विषयावर सविस्तर अशी चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांनी जनतेचे प्रश्न त्वरित सोडाव्यात. उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाचे विभाजन करून नवीन अप्पर तहसील कार्यालय कार्यान्वित करणे उत्तर सोलापूर पंचायत समिती इमारत बांधणे कामासाठी १५ कोटी निधी उपलब्ध करणे, शिरापूर उपसा सिंचन योजनेतील अपूर्ण कामे त्वरित पूर्ण करून सदरची योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणे, उत्तर सोलापूर तालुक्यातील एम एस ई बी चे मंजूर असलेल्या डीपी व कळमण येथील सब स्टेशन अंतर्गत ॲडिशनल ट्रान्स फार्मर चे प्रलंबित असलेले काम त्वरित पूर्ण करावे, नान्नज मार्डी रस्ता ई जि मा ४३ सुधारणा करणे, कामास वन विभागाची परवानगी मिळणेबाबत चा प्रश्न मार्गी लावणे, अतिवृष्टी तील बाधित शेतकऱ्यांना त्वरित अनुदान मिळने, पानंद रस्त्याची कामे सुरू करण्यासाठी होणारी अधिकाऱ्यांची टाळाटाळ याविषयी त्वरित मार्ग काढून सदरची कामे चालू करण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात असी मागणी करण्यात आल्या.

## जयेश कोठारी यांचे अपघाती निधन



**बार्शी :** येथील भारत गॅस कंपनीचे वितरक जयेश कोठारी यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कोठारी हे दि.२२ रोजी सायंकाळी ७.३० वाजता कुर्डुवाडी रस्त्यावरून जात असताना ते दुचाकीवरून खाली पडले.

या अपघातामुळे त्यांच्या डोक्याला मार लागून मेंदुमध्ये रक्तस्त्राव झाला. त्यांना खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर ते बेशुध्दाअवस्थेमध्ये गेले होते. रविवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. दि.२४ रोजी दुपारी ४.०० वाजता त्यांच्यावर हिंदु स्मशानभुमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध स्तरातील नागरिक उपस्थित होते.

## सिद्धार्थ गायकवाड यांचे निधन



**सोलापूर :** जुना बोरामणी नाका, गवई पेठ येथील रहिवासी सिद्धार्थ भानुदास गायकवाड (वय ६१ ) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने सोमवारी निधन झाले. ते सेवानिवृत फौजदार होते . त्यांची अंत्ययात्रा राहत्या घरापासून मंगळवारी दि २५ रोजी सकाळी नऊ वाजता निघणार आहे.शांती चौक स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी ,एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

### जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती महामंडळाचा उपक्रम

## ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात सामूहिक इष्टलिंग पूजा

सुराज्य/सोलापूर



इष्टलिंग पूजेचे वैज्ञानिक महत्त्व जाणून घेत ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात सोमवारी सामूहिक इष्टलिंग पूजा भक्तीभावात भक्तिमय वातावरणात करण्यात आली. जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती महामंडळातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर आणि जगतज्योती महात्मा श्री बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बसववंदना म्हणण्यात आली. यानंतर २०० भाविकांनी सामूहिक इष्टलिंग पूजा केली.

सामूहिक इष्टलिंग पूजेनंतर डॉ. अमरनाथ सोलपुरे यांनी इष्टलिंग पूजेचे वैज्ञानिक महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. सोलपुरे म्हणाले, इष्टलिंग पूजेमुळे मानसिक व आध्यात्मिक प्रगती होते ही पूजा विज्ञानावर आधारित आहे ज्ञानाची परिकल्पना शक्ती वाढण्यासाठी आणि आयुर्मान वाढण्यासाठी ही पूजा फलदायी आहे. शास्त्रीय पद्धतीने पूजा केल्यानंतर मनुष्यातील रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. यातून आलेली अध्यात्मिक अनुभूती अनेकांनी घेतल्याचेही डॉ. सोलपूरे यांनी यावेळी सांगितले.

**सोलापुरात प्रथमच आयोजन**

बसव जयंतीनिमित्त जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती महामंडळातर्फे सामूहिक इष्टलिंग पूजेचे सोलापुरात प्रथमच आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास भाविकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

याप्रसंगी जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष प्रवीण दर्गोपाटील, ट्रस्टी सचिव शिवराज झुंजे, ट्रस्टी अमित रोडगे, जगदीश व्हन्नव, शैलेश वाडकर, गणेश साखरे, बसवव्याख्याते चन्नवीर भद्रेश्वरमठ, मल्लिकार्जुन मुलगे, शरणसाहित्य अभ्यासक भीमाशंकर सिंदगी, सुधाकर कोरे, मल्लिकार्जुन पाटील आदी उपस्थित होते.

## सौंदरेजवळ ४२ हजारांचा विदेशी दारूचा साठा जप्त

सुराज्य/बार्शी

बार्शी-सोलापूर रस्त्यावरील सौंदरे येथे बार्शी तालुका पोलीस स्टेशनच्या पथकाने पेट्रोलिंग करताना मिळालेल्या खबरींनूसार कारवाई करत ४२ हजार रूपयांचा विदेश दारूचा साठा जप्त केला. मिळालेल्या माहितीनूसार दि.२३ रोजी रात्रीचे १०.४५ वाजता भालेराव, उंदरे, आकुलवार, गणेश चव्हाण यांच्या पथकाने सौंदरे बसथांब्याजवळ सापळा रचून पांढऱ्या रंगाची डस्टर चारचाकी वाहन नंबर चक-२१ ८५१० थांबवले या वाहनामध्ये २०,४००/- रूपये किंमतीच्या विदेशी रॉयल स्टॅग कंपनीच्या मद्याच्या बाटल्या तसेच २१,६००/- रूपये किंमतीच्या मॅकडॉल नंबर-१ कंपनीच्या विदेश मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. सदर गाडीच्या चालकाजवळ या मद्य वाहून नेण्याच्या कोणताही वैध परवाना नव्हता. त्यामुळे या पोलीस पथकातील हवालदार गणेश चव्हाण यांने दिलेल्या फिर्यादी नूसार प्रोव्हीशन अक्ट कलम ६५ ई नूसार हे वाहन व मद्याच्या साठा जप्त करण्यात आला. तसेच वाहन चालक बालाजी ज्ञानेश्वर बोधले रा.चोराखळी, ता.कळंब, जि.धाराशिव याला अटक करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.



## कुमार करजगी यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर

कॅलिफोर्निया विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाले प्रित्यर्थ अखिल भारतीय माजी सैनिक संघटने मार्फत कुमार करजगी यांचा सत्कार महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री अरुण कुमार तळेखेडे यांचे अध्यक्षतेखाली नुकताच संपन्न झाला.

करजगी यांना मिळालेली कॅलिफोर्नियाची डॉक्टरेट ही सोलापूर शहराची मान उंचावणारी आहे. असे प्रंशसोदगार ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना काढले. तर करजगी यांनी सत्काराला उत्तर देताना म्हणाले की मी माझ्या आयुष्यात कामगारांचे प्रश्न आणि सोलापूरकरांचे शैक्षणिक ,सामाजिक प्रश्न सत्य प्रामाणिकपणा आणि नीती धर्माची कास धरुन सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे .वास्तविक हा सन्मान सत्याचा आहे असे मी मानतो. अध्यक्ष स्थानावरून अरुणकुमार तळीखेडे यांनी करजगी यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष व महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अरुण कुमार तळीखेडे स्वामी एस एम, बबनराव रोकडे मंगळवेढा , मल्लिनाथ हानमशेटटी, सुभेदार मेजर रावसाहेब काशीद, सुधाकर पोळ, डनरी/ लेफ्टनंट अशोक ढेपे , आबांना माळी, व बरेच माजी सैनिक विरनारी यांचेसह सदस्य उपस्थित होते.

## प्रलंबित वित्तीय अपिल निपटाऱ्यासाठी २७,२८ रोजी कॅम्प

**सोलापूर :** मा. महाराष्ट्र राज्य विक्रीकर न्यायाधिकरण, पुणे यांनी दि. २७ व २८ एप्रिल रोजी राज्यकर कार्यालय, वस्तू व सेवाकर भवन, किनारा हॉटेलजवळ होटगी रोड, सोलापूर येथे प्रलंबित वित्तीय अपिल निपटारा करण्यासाठी कॅम्प आयोजित केला आहे. सदर कॅम्प दरम्यान नियत करण्यात आलेल्या प्रकरणी सुनावणी होणार असून संबंधित अपिलकर्त्यांनी त्याची नोंद घ्यावी. सदर सुनावणीस हजर राहुन आपले अपिल निकाली काढण्यास सहकार्य करावे, असे आवाहन राज्यकर विभागातर्फे राज्यकर सहआयुक्त (वस्तु व सेवाकर कार्यालय) गणेश सुभाष मिसाळ यांच्यातर्फे करण्यात आले आहे.



## प्रियंका तरंगे, स्वाती मदने यांचा सत्कार

सुराज्य/पिलीव

कुसमोड येथे प्रियंका नामदेव तरंगे हिची रत्नागिरी येथे पोलीस पदी निवड झाल्याबद्दल तर स्वाती नाथा मदने यांची कुसमोड ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल लक्ष्मीनगर येथे या दोघींचा सत्कार करण्यात आला.

प्रियंका तरंगे या पत्रकार संजय पाटील यांची भाची आहे.यावेळी झिंजेवस्तीचे माजी उपसरपंच सर्जेराव मदने, बापुराव झिंजे,नानासो लवटे, पिलीव विकास सेवा सोसायटीचे सदस्य नबाजी मदने ,कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील, विजय मदने, सतीश गोंजारी, शशिकांत घडयाळे, विनायक मदने, अंकुश मदने, यंकु पवार, बाबुराव पवार, पांडुरंग गलांडे, वैभव राऊत ,लक्ष्मण वाघमोडे, शंकर मदने, नामदेव तरंगे, दादासो मदने, यल्लापा पवार,राहुल मदने,सुरेश मदने,सागर गोंजारी, अमोल मदने ,दत्तु गारुळे, महेश जाधव,किरण पवार, बुवा पवार उपस्थित होते.

## मृत्यूस कारणीभूत ; रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

फिर्यादी काशिनाथ शिरेप्पा बिराजदार (वय-५५,रा.एस.आर.पी कॅम्प सोरेगाव) यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीडी.१५०५ यावरून त्यांची सासू सुशीला यांना शासकीय दवाखाना बोरामणी चिंता तांडा सोलापूर येथे घेऊन जात असताना कंबर तलाव येथील रेल्वे ब्रीज जवळ आले असता त्यावेळी अज्ञात रिक्षाचालकाने अतिवेगाने रिक्षा चालवून त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यावेळी फिर्यादी यांच्या डोक्यास व गुडघ्याला मुक्कामार लागला व फिर्यादी यांची सासू ( सुशीला सिद्राम कर्जाळ (रा. कामटेकर रेल्वे लाईन फुरसुंगी पुणे) यांच्या डोक्याला गंभीररित्या दुखापत होऊन फिर्यादी यांच्या सासूच्या मृत्यू अज्ञात रिक्षाचालक कारणीभूत झाला आहे.अशा आशयाची फिर्याद काशिनाथ बिराजदार यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.

## पोखरापूर येथील धनजी विठोबा मंदिरातील दागिन्यांची चोरी

सुराज्य/मोहोळ

मोहोळ तालुक्यातील पोखरापूर येथील धनजी विठोबा मंदिराच्या गाभाऱ्यातील सोने व चांदीच्या दोन लिंगाची चोरी अंदाजे किंमत ९५ हजार रुपये अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

पोखरापूर येथे धनाजी विठोबाचे मंदिर आहे.या मंदिरातील अज्ञात चोरट्याने मंदिराच्या परिसरात मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करून मंदिराच्या गाभाऱ्याचे आतील देवाचे अंगावरील सोन्याचे व चांदीचे दोन लिंग किंमत अंदाजे ९५ हजार रुपये चोरून नेले.

### श्रीमती कमलाबेन पटेल इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनचे उद्घाटन

## परिचारिकांनी कोविड योद्धा म्हणून केलेले काम प्रशंसनीय : पालकमंत्री

सुराज्य/सांगोला

**भारतीय डॉक्टर व परिचारिकांचा विशेषत: दक्षिण भारतातील परिचारिकांचा परदेशात सर्वत्र बोलबाला आहे. हे समर्पित भावनेने काम करणारे क्षेत्र असून, कोविड काळात याचा प्रत्यय आला आहे. कोविड काळात परिचारिकांनी कोविड योद्धा म्हणून केलेले काम प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी केले.**



कुंभारी (ता. द. सोलापूर) येथील श्रीमती कमलाबेन पटेल इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन या नवीन बी. एस्सी (नर्सिंग) महाविद्यालयाच्या उदघाट्न कार्यक्रमात ते बोलत होते. माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, राजेंद्र राऊत, आमदार प्रणिती शिंदे, माजी आमदार सर्वश्री राजन पाटील, प्रकाश येलगुरवार आणि नरसिंग मेंगजी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, सहायक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, एम. एम. पटेल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त बिपीन पटेल यांच्यासह ट्रस्टचे संचालक उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे म्हणाले, वैद्यकिय क्षेत्र हे खऱ्या अर्थाने लोकसेवेचे, देह झिजविण्याचे काम असून, कोविड काळात डॉक्टर, परिचारिकांनी समर्पण भावनेने काम केले. या वैद्यकीय महाविद्यालयाच्या उद्घाटनासाठी तत्कालिन राष्ट्रपती उपस्थित राहिले होते. नर्सिंग कॉलेजच्या उद्घाटनासाठी पालकमंत्री उपस्थित आहेत, याचा आनंद आहे. वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणे व ते चालवणे हे कठीण काम असते. प्रवरा येथील वैद्यकीयमहाविद्यालय सुव्यवस्थित चालविण्यात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुख्य भूमिका आहे.

याच पद्धतीने सोलापूरच्या विकासासाठी त्यांचे सर्वतोपरी सहकार्य लाभो, असे सांगून सेवेचे व्रत या नर्सिंग महाविद्यालयातून पुढे चालू राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रास्ताविकात बिपीन पटेल यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेचा हेतू विषद केला. आभार अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी यांनी मानले.



## परशुराम जयंती निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

**सांगोला** : भगवान परशुराम यांच्या जयंती निमीत्त समाजातील पुरस्कारप्राप्त व विविध क्षेत्रात दैदिप्यमान कार्य करुन समाजाची उंची वाढविणाऱ्या अनेक मान्यवरांचा सन्मान तसेच वक्तृत्व स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, महाप्रसाद व मार्गदर्शनपर विचारांची मैफिल अशा भरगच्च कार्यक्रमांनी सांगोला येथील श्रीदत्त मंदीरात भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात सांगोला पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक अनंतराव कुलकर्णी यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सेवानिवृत्त प्राध्यापक भगवंतराव कुलकर्णी यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.तसेच अखंड जीवन आध्यात्मिक क्षेत्रातच व्यतित केल्या बद्दल वेदशास्त्रसंपन्न दत्तदेव (दत्तोपंत) वांगीकर यांचा ह.भ.प.सुभाष लऊळकर सर यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर,तालुक्यात प्रथमच स्वरुप देशपांडे यांनी भागवत संस्कृत संहिता अभ्यास पुर्ण केल्याबद्दल,राजुदादा कुलकर्णी यांची लोकमंगल को-ऑप.बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल,कु.श्रेया कुलकर्णी हिने सांगोला तालुक्यात प्रथमच तबला वादन अलंकार ही पदवी प्राप्त केल्याबद्दल परशुराम युवक संघटनेच्या वतीने या सर्वांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी, अमोल कुलकर्णी यांनी सर्व समाज बांधवांना व उपस्थित परशुराम प्रेमींना मार्गदर्शन करुन आपले विचार व्यक्त केले. परशुराम जन्मोत्सवानिमित्त लहान मुलांसाठी वक्तृत्व स्पर्धा तसेच रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जन्मोत्सवाचा कार्यक्रम संपल्यानंतर आयोजित केलेल्या महाप्रसादाचा सुमारे ३०० भक्तांनी लाभ घेतला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोलदादा लऊळकर यांनी तर,स्वागत अश्विनी कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीपाद वांगीकर यांनी केले आणि आभार पत्रकार नागेश जोशी यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी परशुराम संघटनेचे सर्व कार्यकर्ते व परशुराम प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर कुलकर्णी,श्रीकांत हसबनीस,संजय हसबनीस, मंगेश कुलकर्णी, रविंद्र कुलकर्णी,ओंकार कुलकर्णी, सौ.अनिता बेले,स्नेहल लऊळकर,वैष्णवी लऊळकर, श्रद्धा देशपांडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## कुर्डूवाडीत परशुराम जयंती उत्साहात

**कुर्डूवाडी** : अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने भगवान परशुराम यांची जयंती येथील विठ्ठल मंदिरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन प्रभाकर चिंचवडकर हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. जयवंत समुद्र यांनी परशुरामांच्या जीवनाविषयी उपस्थितांना माहिती दिली. या याप्रसंगी तालुकाध्यक्ष पांडुरंग कुलकर्णी, शहराध्यक्ष अशोक पोफळे,गोविंदराव कुलकर्णी, महेश क्षीरसागर, पद्माकर देशपांडे, महेश मोहोळकर, अनिल आद्ये,विवेक काशीद, अमोल कुलकर्णी, काशीद, अनिल हुकेरी, अभय महाजन ,शंकर बागल, उमेश पाटील, निलेश सुराणा, कुमार बेंडाळे, संकेत पाठक, प्रफुल्ल जोशी, ऋषिकेश देशमुख , सीमा चिंचवडकर, शिल्पा पाठक अंजली हुकेरी, गायत्री पाठक, शिल्पा चिंचवडकर, प्राजक्ता जोशी, स्मिता कुलकर्णी, नेहा कुलकर्णी, अर्चना काशीद, दीपाली महाजन आदी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन संतोष कुलकर्णी यांनी केले तर आभार तालुकाध्यक्ष पांडुरंग कुलकर्णी यांनी मानले.



## दिव्यांग शेख यांना सायकल भेट

**उ. सोलापूर** : कोंडी येथील दिव्यांग हुसेन शेख यांना रमजान ईद निमित्त शिवसेना उपजिल्हाप्रमुख शिवाजी नीळ ह्यांनी तिनचाकी सायकल भेट म्हणून देण्यात आली.

यावेळी कोंडीचे पोलिस पाटील मधुकर शिंदे , संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत,किरण निंबाळकर,राहुल भोसले ,शिवाजी चव्हाण, शाहरुख शेख , शंभुराजे नीळ, शेख कुटुंबीय यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## ग्रंथांच्या सान्निध्यात जीवन समृध्द बनते : जाधव

**सोलापूर** : शासनाच्या वतीने वाचन संस्कृती वाढविण्यासाठी अनेक योजना आहेत त्यांचा उपयोग करून वाचन संस्कृती बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी राष्ट्रपती डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिध्देश्वर उकळे यांनी केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार म्हणाले की,पुस्तके आणि चांगली माणसे लवकर कळत नाहीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरसिंह मिसालोलू यांनी केले तर आभार प्रदर्शन महारुद्र कत्ते यांनी केले. कार्यक्रमास धोंडीराम जेऊरकर,कर्मचारी संघटनेचे पुणे विभागाचे नेते सदाशिव बेडगे,तात्यासाहेब भोसले, सिध्दाराम हलकुडे,जगदीश गीडवीर,विजय पाटील, रमेश फुले, तिप्पण्णा गणेरी,अरिहंत रत्नपारखे,श्रीमती यल्ला व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतीच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवला : खा. निंबाळकर

सुराज्य/सांगोला

**परंपरेने दुष्काळी असणाऱ्या सांगोला तालुक्यातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्य क्रमाने सोडवला आहे सध्या उन्हाळ्यातही निरा उजवा कालव्यातंर्गत सांगोला शाखा क्रमांक -४ व ५ मधून पाणी सोडून छोटे मोठे तलाव, बंधारे भरून दिले जाणार आहेत. विद्यमान आमदार शहाजी बापू आणि माझ्यातील सलोख्याच्या संबंधामुळे तालुक्यातील जनतेला कोणतीही अडचणी समस्या येऊ देणार नाही, आलीस तर त्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांनी सांगितले.**




भाजपाचे माढ्याचे खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर , पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे , सोलापूर जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण व माढा लोकसभा संयोजक जयकुमार शिंदे , भाजपाचे तालुकाध्यक्ष चेतन सिंह केदार यांच्या उपस्थितीत काल सोमवार २४ रोजी सांगोला शहर व तालुका भाजपच्या वतीने बूथ सशक्तीकरण अभियानाच्या अनुषंगाने शक्ती केंद्रप्रमुख व बूथ प्रमुखांची बैठक घेण्यात आली. या बैठकीस ज्येष्ठ नेते शिवाजीराव गायकवाड संभाजी आलदर, अतुल पवार, नवनाथ पवार, उपसरपंच अनिल केदार, दुर्योधन हिप्परकर , विजयकुमार इंगोले, डॉ.अनिल कांबळे, एन वाय भोसले, आनंद फाटे, विलास व्हनमाने , शिवाजी आलदर , डॉ.विजय बाबर , डॉ. जयंत केदार , डॉ मानस कमलापूरकर, मधुकर पवार, संजय गंभीरे , बाळाप्पा येलपले , नागेश जोशी, गणेश कदम, शंभू माने, लक्ष्मण येलपले,फैजुद्दीन शेख ,भाऊ पाटील , शिवाजी ठोकळे ,संजय केदार , पप्पू पाटील ,गणेश घाडगे , अमोल साखरे ,देवा कांबळे, लक्ष्मीकांत लिगाडे यांच्यासह शक्ती केंद्रासह बूथ केंद्रप्रमुख, पदाधिकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत बूथ सशक्तीकरण अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक शक्ती केंद्राला विस्तारक नेमणे, प्रत्येक बूथ निहाय ११ लोकांची समिती गठीत करणे, पन्ना प्रमुख नियुक्ती करणे, प्रत्येक बूथ निहाय दोन व्हाट्सअप ग्रुप बनवणे आणि सरल प डाऊनलोड करून त्या माध्यमातून प्रत्येक बूथ व शक्ती प्रमुखांनी स्वत:सह आपल्या भागातील मतदाराची माहिती भरून डाटा तयार करावा त्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र व राज्यातील शेतकरी सर्वसामान्यांच्या जनहिताचे घेतलेले निर्णय ,राबवलेल्या विकासात्मक योजना, कर्जमाफी सह ध्येय धोरणात्मक घेतलेले निर्णय तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी प्रयत्न करावेत पंतप्रधान नरेंद्र मोदी सरल पच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी जोडले जाऊन बातचीत होणार आहे. त्याचबरोबर येत्या ३०एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ' मन की बात ' चा १०० वा. कार्यक्रम प्रत्येक बूथनिहाय १०० लोकांच्या उपस्थित घ्यावा असे आवाहन पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे यांनी केले यावेळी शशिकांत चव्हाण, तालुकाध्यक्ष चेतन सिंह केदार यांनी विचार व्यक्त केले.

# मार्ग फाउंडेशनच्या वतीने टाकळी येथे महिलांना साड्या वाटप

सुराज्य/द. सोलापूर




विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त टाकळी येथे मार्ग फाउंडेशन आणि भीमगर्जना प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांना साड्या वाटप करण्यात आले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री महात्मा बसवेश्वर, आणि राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले, यांच्या संयुक्त जयंती निमित्त महिलांना साड्या वाटप करण्यात आले. यावेळी मार्ग फाऊंडेशनचे संस्थापक तथा उद्योजक संतोष पवार बोलताना म्हणाले की,आपण सर्वांना मी साडी देतो आपण गरीब आहात म्हणून नाही तर आपण माझी-आई बहीण आहात म्हणून मुलाकडून व भावाकडून ही एक लहानशी भेट आहे. आपण ही छोटीशी भेट स्वीकार केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले व जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्यासारख्या थोर व्यक्तींना जन्म देणारी आईच आहे त्यामुळे आई ही जगातील सर्वात श्रेष्ठ गुरू मानली जाते.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते आसिफ यत्नाळ,सतीश कोळी, टाकळी ग्रामपंचायत सदस्य चंद्रशेखर गायगवळी, प्रकाश उमरगे, बसवराज गायकवाड, बोलुशा साबळे, राजशेखर गायगवळी, दिलीप साबळे, नागेश गायकवाड, प्रकाश साबळे, चांद नदाफ, रेवणसिद्ध व्हनराय, विद्यानंद लोणीकर, गणेश साबळे, बसवनगरचे पोलीस पाटील प्रवीण राठोड, मार्ग फाऊंडेशनचे पदाधिकारी,आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कौशल्य विकसित करा, बेरोजगारी नष्ट होईल : शीतलदेवी

सुराज्य/अकलूज

बेरोजगारी वाढण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे आपणाकडे असलेल्या कौशल्याचा अभाव. आपल्याकडे मनुष्यबळ प्रचंड आहे. पण या मनुष्यबळाकडे पुरेसे कौशल्य नाही. कौशल्य नाही म्हणून काम नाही. तुम्ही जर कष्टाने स्वत:मध्ये एखादे कौशल्य विकसीत केले तर तुमचे हात कधीही कामापासून वंचित राहणार नसल्याचे प्रतिपादन शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांनी केले.

आ. रणजितसिंह मोहिते पाटील व भाजपचे संघटनमंत्री धैर्यशील मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवरत्न शिक्षण संस्था व शिवपार्वती सार्वजनिक विकास व सेवा ट्रस्ट यांचे वतीने आयोजित भव्य रोजगार मेळाव्याचा शुभारंभ धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला..

यावेळी सचिव धर्मराज दगडे, संचालक डॉ.विश्वनाथ आवड, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी यांच्यासह शिवरत्न शिक्षण संस्था व शिवपार्वती शिक्षण संस्थेचे सर्व संचालक व हजारो विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी शितलदेवी मोहिते-पाटील म्हणाल्या, सध्या अनेक तरुण बेरोजगार आहेत, बेरोजगारी वाढत असल्याचे सांगत असलो तरी मात्र दुसऱ्या बाजूला कंपन्यांकडे कौशल्याधारीत मनुष्यबळाची कमतरता आहे त्यांची चांगल्या मनुष्यबळाची गरज संपलेली नाही त्यामुळे नोकरी इच्छुकांनी आपल्यातली हुशारी, कसब आणि मेहनत करण्याची तयारी दर्शवावी म्हणजे नोकरी सहज उपलब्ध होईल. असे सांगत ग्रामीण भागातील विद्यार्थी हुशार आणि होतकरू असल्याने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे आज निवड होईल अशी आशा व्यक्त केली.

प्रास्ताविकात प्रा. संजय साळुंखे यांनी रोजगार मेळावा आयोजनाचा उद्देश स्पष्ट करत या रोजगार मेळाव्यास सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थ्यांकडून व राज्यभरातील कंपन्यांकडून चांगला प्रतिसाद मिळालेला असल्याचे सांगितले.सूत्रसंचालन मेहंदी थोरात यांनी तर प्रा. रंजना कांबळे यांनी आभार मानले.




# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मुदतवाढ

## शिवसेनेच्या मागणीला यश

सुराज्य/उ. सोलापूर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे उत्तर सोलापूर तालुका प्रमुख संजय पौळ ह्यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मुदत वाढ मिळावी अशी दुय्यम निबंधक किरण गायकवाड, जिल्हा अधिकारी मिलिंद शंभरकर यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. मागणीला पणन उपसंचालक पुणे विभाग त्वरित स्वतंत्र आदेश काढून मुदत वाढ देण्याचा निर्णय देण्यात आला असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केलं जातं आहे.

सन २२ -२३ या चालू वर्षी राज्यात फेब्रुवारी च्या सुरुवातीस कांद्याच्या बाजार भावात झालेली घसरण व उपाय योजना अंतर्गत १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत संबंधित कृषी उत्पन्न बाजार समिती , खाजगी बाजार समिती , थेट पणन अनुज्ञप्ती धारकाकडे अथवा नाफेड कडून लेट खरीप कांदा खरेदी करता उघडण्यात आलेल्या खरेदी केंद्रामध्ये विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत आहे.

खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रु३५० प्रती क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रती शेतकरी या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आलेले असल्याचे शासन निर्णय जारी केला आहे.

शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह दि २० एप्रिल २३ पर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक होते. अद्यापपर्यंत बरेच शेतकरी कांदा अनुदान अर्ज करणे बाकी असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे उत्तर सोलापूर तालुक्याच्या वतीने मा जिल्हाधिकारी साहेब व मा जिल्हा उपनिबंधक साहेब यांच्या निदर्शनास आणून दिल्याने सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभाग, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य , पुणे यांचेकडून शेतकऱ्यांना अनुदानासाठी अर्ज करण्याची दिनांक ३० एप्रिल २०२३ पर्यंत मुदत वाढ करण्याचे आदेश पत्रांन्वये पारीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रा बाहेर कांदा विक्री केलेल्या सर्व शेतकऱ्यांना व सात बारा उताऱ्यावर कांदा पीक पाणी नोंद नसलेल्या सर्व शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे, १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २३ पर्यंत अनुदान देण्या ऐवजी ३१ एप्रिल २३ पर्यंत कांदा विक्री केलेल्या सर्व शेतकऱ्यांना अनुदानामध्ये समाविष्ट करण्यात यावे. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी उपजिल्हाप्रमुख विक्रांत काकडे, उपतालुका प्रमुख अच्युतराव बाभळे, महिला आघाडी तालुका अध्यक्ष परिणीता शिंदे, उपतालुका प्रमुख सचिन घोडके, राजू घाटे, धनंजय लामकाने, उपविभाग प्रमुख अरुण लोंढे, पांडुरंग मळगे, महेंद्र डोंबाळे , दादासाहेब काशिद, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत चव्हाण, पांडुरंग कापसे उपस्थित होते.

## बुर्ला महाविद्यालयात बसवेश्वर जयंती

**सोलापूर** : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ.अशोक एक्कलदेवी यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. शिरीष भोसले, प्रा.डॉ. शिंदे टि. एन., प्रा. डॉ. नी जॉन, प्रा. डॉ. रजनी दळवी, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा. डॉ. शंकर राजे उपस्थित होते.



# प्राण वाचवण्याचे काम प्रामाणिकपणे करतोय : डॉ. इनामदार

सुराज्य/श्रीपूर

माझ्यासाठी देवाने जे लोकांचे प्राण वाचवण्याचे जे काम दिले आहे ते प्रामाणिकपणे मी करत आहे, वैद्यकिय क्षेत्रात ४२ वर्ष काम करत असून या कालखंडामध्ये अटॅक आलेले पेशंट, सर्पदंश झालेले पेशंट ,बायपास शस्त्रक्रिया केलेले पेशंट यासह हजारो पेशंटचे प्राण वाचवण्याचे काम केले, असे प्रतिपादन प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ एम के इनामदार यांनी केले.

ते श्रीपूर येथील हनुमान मंदिर येथे जागृती तरुण मंडळाच्या वतीने शिवजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जागृती तरुण मंडळाचे अध्यक्ष अभिजित आहेरसिंग यांनी करून गेले ४२ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात करत असलेल्या कामांचा लेखाजोखा मांडला. यावेळी ज्येष्ठ नेते रामचंद्र सावंत पाटील यांचा डॉ. एम के इनामदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीचे नगराध्यक्षा सौ लक्ष्मी चव्हाण, उपनगराध्यक्ष भिमराव रेडे पाटील, नगरसेवक-: सौ कल्पना काटे, नाजिया पठाण, सौ. उज्ज्वला लोखंडे, तेजश्री लाटे, सोमनाथ मुंडफणे , प्रकाश नवगीरे , निनाद पटवर्धन, नामदेव इंगळे, आदींचा जागृती तरुण मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी रामचंद्र सावंत पाटील, नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण, उपनगराध्यक्ष भिमराव रेडे पाटील, ग बा कुलकर्णी, डॉ. सुधीर पोफळे, प्रकाश केसकर, श्रीकांत शिंदे, आदींनी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ. सुधीर पोफळे, डॉ. हरिश्चंद्र सावंत पाटील, डॉ. सुनील फडे, डॉ. जितेंद्र गायकवाड,शिवसेनेचे नितीन वाघमारे,माजी जि.प. सदस्य अरुण तोडकर, मोहसीन पठाण, देविदास काळे, विक्रम लाटे, सतीश लांडगे,रशीद मुलाणी, श्रीकृष्ण पुजारी, जालिंदर लोखंडे, बाळासाहेब कमते,भाजपा महिला तालुका अध्यक्षा कल्पना कुलकर्णी, सुलभा मनोहर उपस्थित होते. सूत्रसंचालन नितीन देशपांडे यांनी केले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी मिलिंद कुलकर्णी, प्रकाश केसकर, जयंत कुलकर्णी,मंडळाचे अध्यक्ष अभिजित अहेरसिंग,कार्याध्यक्ष मोहित कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीपाद सुमंत, सुरेश पुराणिक, संजय सुमंत, जगदीश कुलकर्णी, तुकाराम केसकर, नरेंद्र खळकर, सचिन नागणे, प्रवीण कुलकर्णी, प्रवीण शिंदे, गणेश गुडे, श्रीकांत शिंदे ,अरुण गायकवाड, नितीन देशपांडे, पांडुरंग हाटकर, शिरीष खोत, संजय मर्डिकर, प्रतीक केसकर, प्रसाद सुमंत ,सार्थक मार्डिकर आदींनी परिश्रम घेतले.

# महादेव वाघमोडे यांना राजधानी सातारा क्रीडा पुरस्कार

सुराज्य/नातेपूते

फोंडशिरस (तालुका माळशिरस) येथील महादेव वाघमोडे यांना क्रीडा क्षेत्रातील राजधानी सातारा क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आला सदर पुरस्कार अमेंचूर तायक्वांदो असोसिएशन ऑफ सातारा आणि यश तायक्वांडो अँड स्पोर्ट क्लब मायणी यांच्यावतीने कै. शंकरराव पाटील सभागृह मायणी येथे डॉ. संतोष सरस्ते यांच्या शुभहस्ते देण्यात आला.




यावेळी मार्गदर्शनपर बोलत असताना डॉक्टर संतोष सरस्ते म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात माणूस केवळ भौतिक साधनात अडकून पडल्याने त्याचा मानवी मन, मेंदू व शरीरावर विपरीत परिणाम होतो आहे. यातून सुटका करून घेण्यासाठी प्रत्येकाने खेळाद्वारे आपले मन व शरीराला सक्षम बनवा.असे प्रतिपादन डॉ. संतोष सरस्ते यांनी आयोजित केलेल्या राजधानी सातारा गौरव क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी केले. यावेळी डॉ सयाजीराव पवार, लेखक बाळासाहेब कांबळे, गफार पठाण, विजय खंडाईत, अमोल पालेकर, सुधीर लोहार, सुरेश चौधरी सांगली, पद्माकर कांबळे कोल्हापूर, विक्रमसिंह दुबल, सागर गोडेकर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते

## स्वत:ला भारतीय म्हणवून घेणारे पाक लेखक फतेह यांचे निधन



✔ **पाकिस्तान** : पाकिस्तानी वंशाचे लेखक आणि पत्रकार असलेले पण स्वत:ला भारतीय म्हणवून घेणारे तारिक फतेह (ढीशिक्ष ॠींरह झरींशव ूरू) हे काळाच्या पडद्याआड गेले आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून ते कॅन्सरशी दोन हात करत होते. पण अखेरीस त्यांची या आजाराशी झुंज अपयशी ठरली असून त्यांचे निधन झाले आहे. ते %३ वर्षांचे होते. तारिक फतेह यांच्या निधनाची माहिती त्यांची मुलगी नताशा फतेह हिने ट्वीट करत दिली. तारिक फतेह हे कायमच भारताच्या बाजूने बोलताना दिसून आले. त्यामुळे ते पाकिस्तानी वंशाचे असताना देखील भारताचे गोडवे गात असल्याने त्यांच्यावर कायमच टीका करण्यात आली. तर त्यांनी अनेकदा इस्लाम धर्माशी संबंधित मुद्द्यांवर आक्रमक भूमिका मांडल्याने त्यांच्या मुलीला जीवे मारण्याची धमकी देखील देण्यात आली होती.

## सुदानमध्ये स्थिती चिघळली; भारतीयांसाठी ऑपरेशन कावेरी

✔ **मुंबई** : सुदानमध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धामुळे तेथील परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत आहे. यामुळे तिथे जवळपास हजारो भारतीय नागरिक अडकले आहेत. या गृहयुद्धातून आपल्या भारतीय नागरिकांना सुखरुप बाहेर काढण्याकरता भारताने ऑपरेशन कावेरी सुरू केले आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी याबाबत ट्वीट केलं असून सुमारे ५०० भारतीय सुदान बंदरावर पोहोचले असल्याचे त्यांनी सांगितले. सुदानमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना परत आणण्यासाठी ऑपरेशन कावेरी सुरू करण्यात आले आहे. सुमारे ५०० भारतीय सुदा बंदरावर पोहोचले आहेत. काही भारतीय या मार्गावर आहेत. आमची जहाजे आणि विमाने भारतीयांना मायदेशी आणण्यासाठी सज्ज आहेत. सुदानमधील आमच्या सर्व बांधवांना मदत करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत, असं ट्वीट जयशंकर यांनी केलं आहे. सुदानमध्ये अडकलेल्या नागरिकांना मायदेशी आणण्यासाठी वायुसेनेचे दोन सी-१३० विमान आणि आयएनएस सुमेधा जहाज सौदी अरेबिया आणि सुदानमध्ये पोहोचले आहेत. वायुसेनेचे जहाज सौदी अरेबियाच्या हद्दीत तैनात आहेत.

## ममता बॅनर्जींचा भाजपावर हल्लाबोल

✔ **बंगाल** : देशात २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी विरोधी पक्षांच्या एकजुटीचा प्रयत्न सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची (२४ एप्रिल ) भेट घेतली. भाजपाला हिरो ते झिरो करायचं आहे,' असा हल्लाबोल ममता बॅनर्जी यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. ममता बॅनर्जी म्हणाल्या, जयप्रकाश यांनी बिहारमधून आपल्या आंदोलनाला सुरूवात केली होती. त्यामुळे विरोधी पक्षांमधील एकतेचा संदेश देण्यासाठी बिहारमध्ये एक बैठक झाली पाहिजे. याबाबत नितीश कुमार यांच्याशी चर्चा झाली आहे. आमचा उद्देश भाजपाचा पराभव करणं आहे. माध्यमे, गुंडगिरीच्या माध्यमातून भाजपा हिरो बनला आहे, अशी टीका बॅनर्जींनी केली आहे.

## पुण्याचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

✔ **पुणे** : पर्वती जलशुद्धीकरण केंद्र, लष्कर जलकेंद्र, नवीन आणि जुने होळकर जलकेंद्र, भामा-आसखेड जलकेंद्र, वारजे, एसएनडीटी, चतु:श्रृंगी, वडगांव जलकेंद्र, कोंढवे-धावडे जलकेंद्र येथे महापालिकेच्या वतीने देखभाल दुरुस्तीची कामे येत्या गुरुवारी (२७ एप्रिल) करण्यात येणार आहेत. त्यामुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे. शुक्रवारी म्हणजे दुसऱ्या दिवशी (२८ एप्रिल) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.

**पाणीपुरवठा बंद असणारा भाग पुढीलप्रमाणे**- मध्यवर्ती भाातील सर्व पेठा, क्वार्टरगेट परिसर, गंजपेठ, गुरुवार पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजी नगर, स्वारगेट, सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणीनगर १ आणि २, लेक टाऊन परिसर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी गावठाण, डायस प्लॉट, ढोले मळा परिसर, सॅलेसबरी पार्क, गिरीधर भवन चौक परिसर, पर्वती गावठाण, मीठानगर, शिवनेरी नगर, भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द, पर्वती दर्शन, तळजाई, कात्रज, धनकवडी परिसर, हडपसर, सातववाडी, गोंधळेनगर, ससाणेनगर, काळे पडळ, बीटी कवडे रस्ता, भीमनगर, रामटेकडी, औद्योगिक परिसर, वानवडी, पुणे कॅन्टोन्मेंट परिसर, केशवनगर, साडेसतरा नळी, फुरसुंगी, उरूळी देवाची, मांजरी बुद्रुक, शेवाळवाडी, खराडी, वडगांवशेरी, ताडीवाला रस्ता, मंगळवार पेठ, मालधक्का, येरवडा, रेसकोर्स, मुळा रस्ता, खडकी, हरीगंगा सोसायटी, लोहगांव, विमाननगर, वडगांवशेरी, कल्याणीनगर, विश्रांतवाडी, फुलेनगर, येरवडा, कळस, धानोरी, पाषाण, भूगाव रस्ता, बावधन, उजवी आणि डावी भुसारी कॉलनी, गुरूगणेशनगर, चिंतामणी सोसायटी आदीं भागांमध्ये पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे.

## फळांचा राजा आला सामान्यांच्या आवाक्यात

✔ **नाशिक** : शनिवारी साजऱ्या झालेल्या अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर स्थानिक बाजारपेठेत आंब्यांची आवक काही प्रमाणात वाढली होती. त्यामुळे पंधरा दिवसांपूर्वी प्रचंड महाग असलेला आंबा आता सर्वसामान्यांसाठी गोड झाला आहे. गेल्या आठ दिवसांपासून शहरात दररोज सरासरी २० ते २५ क्विंटलहून अधिक आयात होत आहे. आवक वाढल्याने दर घसरून फळांचा राजा सामान्यांच्या आवाक्यात येऊ लागले. सध्या बाजारात रत्नागिरी आणि कोकणसह गुजरातमधून हापूस, लालबागसह केशर, तर आंध्रप्रदेश, कर्नाटक आदी राज्यांतून बदाम, हापूस आंबा दाखल झाला आहे. आवक वाढल्याने गेल्या आठवड्याच्या तुलनेत दरांत ५० ते १०० रुपयांची घसरण झाली असून, यापूर्वी २०० ते २५० रुपये किलोने मिळणारा लालबाग आंबा सध्या १५० रुपये किलोवर आला आहे. ३०० रुपयांना मिळणारा केशर आंबा किलोमागे ५० रुपयांनी घसरून २५० रुपयांवर आला आहे. बदाम आंब्याचे दरही किलोमागे ४० ते ५० रुपयांनी घसरले आहेत. यासह हापूस आंबाही शंभर रुपयांनी स्वस्त झाला असून, ४०० ते ४५० रुपये किलो मिळणारा हापूस आता ३०० ते ४०० रुपये प्रतिकिलो झाला आहे. महिनाभरापासून खाद्यतेलाचे दर प्रचंड वाढले आहेत. त्यामुळे चणाडाळ आणि गूळही पाच रुपयांनी महागला. सध्या बाजारात चणाडाळ ८० रुपये किलो, तर गूळ ६० रुपये किलोप्रमाणे विक्री होत आहे. साखरही ४० रुपये किलोंवर जाऊन पोहोचली आहे.



# तोपर्यंत सरकारी दस्तावेजांवर औरंगाबादचे नाव बदलू नका

## ▶▶ मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

✔ सुराज्य/छ.संभाजीनगर

**केंद्र सरकारने औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर नावाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. नावाला मंजुरी मिळाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये नामांतराला विरोध झाला. नामांतराच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल याचिकेवर महत्त्वाचा आदेशात म्हटले की, नामांतर बाबत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत सरकारी दस्-तऐवजावर औरंगाबाद च नाव बदलू नका असे म्हटले आहे.**

राज्य सरकारने औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्या-चा नामांतराचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला होता. या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली. मात्र त्यानंतर औरंगाबादच्या नामांतराला विरोध झाला. पुढे दोन्ही जिल्ह्याच्या नामांतराविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या. या याचिकांद्वारे याचिकाकर्त्यांनी आपली भूमिका कोर्टापुढे मांडली.


यामध्ये पोलीस आयुक्तालय, न्यायालय, महसूल, टपाल कार्यालय अशा ठिकाणी छत्रपती संभाजीनगर या नावाचा खुला वापर सुरू असल्याची तक्रार याचिकाकर्त्यांनी आपल्या याचिकांद्वारे केली.

या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणी दरम्यान नामांतराबाबत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत औरंगाबादचं नाव सरकारी दस्-तऐवजावर बदलू नका आणि जर असे होत असेल तर ते तात्काळ थांबावा, असे आदेश न्यायालयाने दिले आहे. कोर्टाच्या या आदेशामुळे याचिकाकर्त्यांना दिलासा मिळाला आहे.




## न्यूझीलंड भूकंपाने हदरले, कोणतीही जीवित-वित्तहानी नाही

✔ **न्यूझीलंड** : न्यूझीलंड भूकंपाने हदरले आहे. सोमवारी सकाळी न्यूझीलंडमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने (एनएससी) या संबंधी माहिती दिली आहे. रिश्टर स्केलवर भूकंपाची तीव्रता ७.२ नोंदवण्यात आली आहे. सकाळी ६.११ वाजता न्यूजीलंडच्या केर्माडिक बेटावर हा भूकंप झाला आहे. या भूकंपात मोठी हानी झाली नसल्याची माहिती आहे.



एनएससीने दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपाचा केंद्रबिंदू जमीनीखाली दहा किलोमीटर होता. भूकंपात कोणत्याही जीवितहानीची माहिती नाही. तसेच सुनामीचा कोणताही धोका नाही, अशी माहिती देण्यात आली आहे.

हवामान बदलामुळे संपूर्ण जग सध्या चिंताग्रस्त आहे. कुठे बर्फ वितळत आहे, तर कुठे उन्हाळ्यात शीत लहर येत आहे. तर कुठे अवकाळी पाऊस सुरु आहे. निसर्गचक्र विस्कळीत झाल्याने अशा घटना वाढत आहेत. गेल्या महिन्यात न्यूझीलंडमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले होते. तेव्हाही केर्माडिक बेटाजवळ जमीन हादरत होती. त्यानंतर भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ७.१ एवढी होती.

## ग्रामस्थांचा विरोध डावलून 'रिफायनरी'साठी सर्वेक्षण

### सत्यजित चव्हाण, मंगेश चव्हाणला अटक

✔ सुराज्य/मुंबई

नाणार रद्द झाल्यानंतर बारसू सोलगाव येथे प्रस्तावित असलेल्या रिफायनरीसाठी सोमवारी २४ एप्रिल रोजी सर्व्हेक्षण होणार असून याला ग्रामस्थांनी जोरदार विरोध केला आहे. कुठल्याही परिस्थितीत आम्हाला रिफायनरी नको असून तसे ग्रामसभांचे ठराव आम्ही केले आहेत. मात्र या ठरावाला न जुमानता आणि ग्रामस्थांच्या भावनांचा विचार न करता शिंदे सरकार प्रशासनाच्या बळजबरीने माती आणि पाणी परीक्षण करत आहे, असा घणाघात बारसू सोलगाव रिफायनरी विरोधी संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र जोशी यांनी केला आहे. मात्र हा विरोध डावलून १६०० पोलीस आणि अधिकारी प्रशासनाने तैनात केले आहे. यातील गंभीर बाब म्हणजे ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण पसरवण्यासाठी आधीच सामजिक कार्यकर्ते सत्यजीत चव्हाण, मंगेश चव्हाण यांना अटक करण्यात आली आहे.



नुकत्याच खारघर येथे झालेल्या घटनेत उष्माघाताने १४ जणांचा मृत्यू झाला होता. राज्यातील उष्णता मोठ्या प्रमाणावर वाढली असून लोकांना बाहेर पडणे अशक्य असताना रत्नागिरी प्रशासनाने अचानक सर्व्हेक्षणाचा निर्णय घेत ग्रामस्थांच्या जीवाशी खेळ चालवला आहे. प्रकल्पाला विरोध करण्यासाठी मोठ्या संख्येने महिला, वृद्ध आणि मुले बाहेर पडल्यास त्यांच्या काही जीवाचे बरेवाईट झाल्यास त्याची जबाबदारी शिंदे- फडणवीस सरकार घेणार आहे का? असा सवाल जोशी यांनी उपस्थित केला आहे. याआधी सुद्धा दोनदा प्रशासनाने सर्व्हेक्षणासाठी प्रयत्न केला होता. मात्र ग्रामस्थांच्या जोरदार विरोधामुळे त्यांना काढता पाय घ्यावा लागला होता. मात्र कुठल्याही परिस्थितीत यावेळी मोठ्या संख्येने पोलीस यंत्रणा हाताशी घेऊन आणि प्रचंड उष्णतेचा फायदा घेऊन सर्व्हेक्षण उरकून टाकण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याचे परिसरातील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

रिफायनरीच्या भीषणतेचे वास्तव मांडणाऱ्या पत्रकार शशिकांत वारीशे यांची हत्या झाल्यानंतर एकूणच या परिसरातील दहशतीचे वास्तव देशासमोर आले होते.

## काँग्रेस देणार २०० युनिटपर्यंत मोफत वीज

### महिलांना २०००, बेरोजगारांना ३००० रुपये भत्ता



✔ **कर्नाटक** : कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने मोठी घोषणा केली आहे. काँग्रेस लवकरच कर्नाटकात सरकार स्थापन करणार असल्याचा दावा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. कर्नाटकमध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्याच कॅबिनेट बैठकीत काँग्रेस कर्नाटकातील नागरिकांसाठी महत्त्वाच्या घोषणा करणार असल्याचे खरगे यांनी म्हटले आहे.

काँग्रेसचे कर्नाटकमध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर २०० युनिटपर्यंत मोफत वीजेसह महिलांना दरमहा २००० रुपये आणि बेरोजगार युवकांना ३००० हजार रुपये महिना बेरोजगार भत्ता देण्याची घोषणा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे.

कर्नाटक विधानसभेच्या २२४ जागांसाठी १० मे रोजी मतदान होणार आहे. १३ मेला मतमोजणी होणार आहे. काँग्रेसला १५० जागांवर विजय मिळवण्याचा विश्वास आहे. कर्नाटकमध्ये १९८९ मध्ये कोणताही पक्ष दुसऱ्यांदा सत्तेत आलेला नाही. त्यामुळं कर्नाटक काँग्रेसकडे जाणार का?, अशा देखील चर्चा आहे.

काँग्रेसने महिला आणि युवकांसाठी बेरोजगार भत्ता देण्याची घोषणा करुन पहिल्याच कॅबिनेटमध्ये याची अंमलबजावणी करणार असल्याचाही दावा केला आहे. यामुळे काँग्रेसमध्ये मोठा आत्मविश्वास या निवडणुकीत निर्माण झाला असल्याची चर्चा आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे देखील कर्नाटकातील असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वात पक्ष येथे लढत आहे.

**काय आहे काँग्रेसची घोषणा?**

**गृह ज्योती योजना**

▶▶ कर्नाटकात प्रत्येक कुटुंबाला २०० यूनिटपर्यंत मोफत वीज पुरवठा.

**गृह लक्ष्मी योजना**

▶▶ प्रत्येक महिलेला दरमहा २००० रुपये घर खर्चासाठी देण्याची योजना.

**युवा निधी**

▶▶ पदवीधर बेरोजगार युवकांना दरमहा ३००० रुपये आणि डिप्लोमा धारक बेरोजगार युवकांना दरमहा १५०० रुपये देण्याची काँग्रेसची युवानिधी योजना आहे.

**अन्नगृह**

▶▶ दारिद्रेषेखालील कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला दर महा १० किलो तांदुळ दरमहा मोफत देण्याची योजना काँग्रेस अध्यक्ष खरगेंनी जाहीर केली आहे.

## तीन अपत्य असलेल्या आमदार आणि खासदारांना अपात्र ठरवावे

### अजित पवारांचे बारामतीत विधान

✔ सुराज्य/मुंबई

जगभरातील लोकसंख्येच्या बाबत संयुक्त राष्ट्राच्या युनायटेड नेशन्स पॉप्युलेशनच फंडचा अहवाल अलीकडेच समोर आला आहे. त्यात भारताने लोकसंख्येतबाबतीत चीनला मागे टाकल्याचं सांगितलं आहे. या अहवालानुसार भारताची लोकसंख्या १४२८ दशलक्ष झाली आहे. तर, चीनची लोकसंख्या १४२५ दशलक्ष एवढी आहे. त्याच पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते अजित पवार यांचं एक विधान समोर आलं आहे.

तीन अपत्ये असलेल्या खासदार आणि आमदारांना अपात्र ठरवण्यात यावं, अशी मागणी अजित पवारांनी केंद्रातील मोदी सरकारकडे केली आहे. ते बारामतीतील एका कार्यक्रमात बोलत होते.

अजित पवार म्हणाले, देशात लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना तीन अपत्ये असलेल्या लोकप्रतिनिधींना अपात्र ठरवण्याचा निर्णय घेतला होता. पण, तीन अपत्य असूनही काही खासदार आणि आमदारांना अपात्र का केलं नाही? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.



खासदार आणि आमदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. त्यामुळे तीन अपत्य असलेल्या आमदार आणि खासदारांना केंद्र सरकारने अपात्र ठरवावं, असं अजित पवारांनी म्हटलं आहे. इंडियन एक्प्रेस'ने याबाबत वृत्त दिलं आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत अजित पवारांनी लोकसंख्येवरून जोरदार टोलेबाजी केली होती. जगात सर्वात जास्त लोकसंख्या आपल्या देशात झाली आहे. त्यामुळे आता अतिशय कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे. संतती प्राप्ती ही काही देवाची कृपा नव्हे, तर ही नवरा बायकोची कृपा असते. हे कृपया आपण सर्वांनी आता तरी मान्य करायला हवं.


लोकसंख्या वाढीमुळे आपल्याला अनेक प्रश्नांना रोज सामोरं जावं लागतं. जगातील सर्वात तरुणांची संख्या असलेला देश आपण आहोत. पण, भविष्याचा विचार केला पाहिजे. पुढच्या पीढीचं नुकसान होणार नाही, याचं चिंतन केलं पाहिजे आणि कठोर निर्णय घेतला पाहिजे, असंही अजित पवारांनी म्हटलं.

## दगडूशेठ गणपतीच्या आंब्यांचे पुढे काय झाले?

✔ सुराज्य/पुणे

पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला शनिवारी २२ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीयेनिमित्त खास आंब्यांची आरास करण्यात आली होती. दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर रत्नागिरीतील ११ हजारहून अधिक आंब्यांनी सजवण्यात आलं होतं.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्य तृतीयेच्या दिवशी बाप्पाला ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य दाखवण्यात आला होता. या दिवशी आंबा महोत्सव साजरा करण्यात आला. त्यासाठी मंदिरात सकाळी सहा वाजता आंब्याची सजावट करण्यात आली होती. त्यानंतर २४ तासांत ही सजावट उतरवण्यात आली. बाप्पाच्या सजावटीसाठी वापरण्यात आलेले आंबे काढल्यानंतर ते अनाथाश्रमातील मुलं, ससून रुग्णालयातील रुग्ण, वृद्धाश्रम आणि मंदिरात आलेल्या भाविकांमध्ये वाटण्यात आले.



पुण्यातील आंब्यांचे प्रसिद्ध व्यापारी श्री देसाई बंधु आंबेवाले मंदार देसाई आणि त्यांच्या कुटुंबाच्या वतीने बाप्पाला हे आंबे दान करण्यात आले होते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी बाप्पाला आंब्यांचा नैवेद्य दाखवण्याची तसंच आंब्याची सजावट करण्याची ही वार्षिक परंपरा आहे. तसंच आंबा हे गणपती बाप्पाचं आवडतं फळ असल्याचंही मानलं जातं. आंबा व्यापारी देसाई बंधू आंबेवाले यांच्या हस्ते हे आंबे दान करण्यात आले होते.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे खजिनदार महेश सुर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ हजार आंबे सजावटीसाठी वापरण्यात आले होते. त्यापैकी आंब्यांपैकी ५० टक्के आंबे हे धर्मादाय संस्थांना वाटण्यात आले. त्यानंतर बाप्पाची आरती झाल्यानंतर उर्वरित ५० टक्के आंबे भाविकांमध्ये प्रसाद म्हणून वाटण्यात आले. सजावटीसाठी वापरण्यात आलेले सुमारे १२०० आंबे ससून रुग्णालयातील रुग्णांना देण्यात आले.

बाप्पाच्या सजावटीसाठी वापरलेले आंबे सहज स्वच्छ करून खाता येतील अशा पद्धतीने वापरण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. आंब्याच्या सजावटीचे डेकोरेटर सुभाष सरपाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय तृतीयेच्या दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत मंदिराचा परिसर सजवण्यासाठी जवळपास ५० कामगारांनी रात्रंदिवस काम केलं. झेंडूच्या फुलांनी साडेपाच फुटांची सजावट करण्यात आली. मंदिराभोवती आंब्याचं आणि फुलांचं तोरण, फुलांची सजावट करण्यात आली होती.

# खारघर दुर्घटना : दोन दिवसीय अधिवेशन बोलवा

## आ.प्रणिती शिंदे यांची मागणी

सुराज्य/सोलापूर

**खारघर दुघर्टनेची सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी यासाठी विधिमंडळाचे दोन दिवसीय विशेष अधिवेशन बोलविण्यात यावे तसेच या दुर्घटनेची जबाबदारी घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा , ती मागणी आमदार प्रणिती शिंदे यांनी केली आह. श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील शहराध्यक्ष चेतन नरोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.**



यावेळी बोलताना आमदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, खारघर येथील महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्यात १४ श्री सदस्यांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर व मनाला वेदना देणारी आहे. हा सोहळा भाजप आणि शिंदे सरकारने आयोजित केला होता. तसेच यासाठी तब्बल १३ कोटी रुपये सरकारी तिजोरीतून खर्च केले गेले. एवढा मोठा खर्च करूनही लाखो श्रीसदस्यांना मात्र कडाक उन्हात तासन तास बसावे लागले. त्यांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून साधे छत लावण्याची काळजी भाजप आणि शिंदे सरकारने घेतली नाही. त्यांना पिण्याचे पाणी मिळू शकले नाही. आणि उष्माघाताने अनेक श्रीसदस्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले.

ढिसाळ नियोजनामुळे १४ श्रीसदस्यांच्या मृत्यू झाले आहेत. व ५०० पेक्षा जास्त श्रीसदस्य उपचार घेत आहेत हा आकडा जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही मात्र भाजप आणि शिंदे सरकार सत्य परिस्थिती लपवत आहे. यामधील सत्य बाहेर येण्यासाठी सरकारने दोन दिवसीय अधिवेशन बोलवावे, या प्रकाराला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी आमची मागणी आह.

या दुर्घटनेची जबाबदारी घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा अशी मागणी आ. प्रणिती शिंदे यांनी केली आहे. महापालिका निवडणुका वर्ष झाले तरी होत नाहीत. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभा ठरलेल्यावेळी होतील की नाही शंका आहे, असे म्हणत मी मात्र सध्या शहर मध्यमध्येच राहणार असल्याचे आ. शिंदे यांनी शेवटी सांगितले.

### पुस्तक वाचल्यानंतर सावरकरांबद्दलचे मत बदलले

सावरकर यांच्या बद्दल एकेकाळी आपल्याला आदर होता मात्र त्यांचे पुस्तकातील सहा पान वाचल्यानंतर आणि शिवाजी महाराज तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दलची मते वाचल्यानंतर आपले त्यांच्याबद्दलचे मत बदलले आणि मनात शंका असल्याचे आमदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

### कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार येईल

कर्नाटकामध्ये काँग्रेसला सध्या चांगले वातावरण आहे. सर्वेमध्येही काँग्रेसची सत्ता येईल असे दाखवले जात आहे. वातावरणही तसेच आहे मात्र भाजप काहीही करू शकतो त्यामुळे आम्हाला गाफील राहून चालणार नाही. केंद्र सरकारकडून काँग्रेस नेत्यांना वारंवार त्रास दिला जात आहे त्यामुळे ग्राउंड लेव्हलला जाऊन आम्हाला काम करावे लागेल, असे आमदार प्रणिती शिंदे म्हणाल्या.

# डीपीसी निधीतून पोलीस दलास २० वाहनांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

सुराज्य/सोलापूर



पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी शासन विविध उपक्रम राबवित आहे. याच पार्श्वभूमिवर जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पोलीस आयुक्तालय तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) कार्यालयास चारचाकी व दुचाकी वाहने उपलब्ध झाल्याने जिल्हा पोलीस दल अधिक गतिमान होईल, असा विश्वास राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला

जिल्हा पोलीस दलास (शहरी व ग्रामीण) जिल्हा विकास यंत्रणेच्या निधीतून प्राप्त झालेल्या २० वाहनांच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. जिल्हा नियोजन भवनच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आ. समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, रणजीतसिंह मोहिते - पाटील, महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, निवासी उपजल्हाधिकारी शमा पवार, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे आदि उपस्थित होते. जिल्हा विकास यंत्रणेच्या माध्यमातून शहर पोलीस आयुक्त कार्यालयासाठी ९ चारचाकी व ४ दुचाकी तसेच ग्रामीण पोलीस दलास १२ चारचाकी वाहने प्राप्त झाली आहेत. त्यांचे पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून लोकार्पण करण्यात आले. संपूर्ण पोलीस दल हे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तत्परतेने कार्य करत असते. पोलीस दलाच्या अधिक क्रियाशीलतेसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पोलीस दलास वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. पोलिसांना गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी तसेच नागरिकांना तात्काळ सेवा देण्यासाठी, दुर्घटनास्थळी तात्काळ पोहोचण्यासाठी या वाहनांचा उपयोग होणार असल्याचे मत पालकमंत्र्यांनी व्यक्त केली.

# कोनापुरे चाळ येथे दोन गटात मारामारी; महिलेसह ५ जण जखमी

सुराज्य/सोलापूर

रेल्वे लाईन परिसरातील कोनापुरे चाळ येथे पैशाच्या व्यवहारातून दोन गटात बादली, लोखंडी रॉड, आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत एका महिलेसह ५ जण जखमी झाले. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.




चंद्रकांत व्यंकटेश आनंद (वय २५) आणि त्याचा भाऊ पारस आनंद (वय २१ दोघे रा. कोनापुरे चाळ) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. त्यांना पैशाच्या कारणावरून मोनिश घंटे, अमर घंटे आणि अन्य एक महिला या तिघांनी मिळून स्टीलची बादली आणि लोखंडी रॉडने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील मोनिश शंकर घंटे (वय२७) त्याची पत्नी प्रतिभा घंटे (वय २५) आणि अमर रामचंद्र घंटे (वय २५ सर्व रा. कोनापुरे चाळ) असे तिघेजण जखमी झाले. त्यांना योगेश आनंद, सोनू आनंद आणि वायजे आनंद या तिघांनी मिळून लोखंडी पाईप आणि लाथाबुक्याने मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

### जुना पुणेनाका येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने पादचारी ठार

**सोलापूर** : जुना पुणे नाका परिसरातील समर्थ हॉटेल जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने ५० ते ५५ वर्षीय अनोळखी पादचारी इसम ठार झा२१ला. हा अपघात सोमवारी सकाळच्या सुमारास घडला. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.



# हैदराबाद-सोलापूर गाडीचे रेल्वे स्टेशनवर स्वागत

सुराज्य/सोलापूर

सोलापूर गाडी सोमवारी सोलापूर रेल्वे स्टेशनवर दुपारी आगमन होताच रेल्वे प्रवासी संघटनेकडून गाडीचे स्वागत करण्यात आले. गाडीवर हार- फुलांचा वर्षाव करण्यात आला तर चालकाचा सत्कार करण्यात आला. साऊथ मध्य रेल्वे विभागाने २४ एप्रिल ते १४ मे दरम्यान हैदराबाद सोलापूर गाडी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या गाडीला प्रतिसाद मिळाल्यास ही गाडी पुढे सुरू राहणार आहे. सोमवारी सकाळी ही गाडी ६ वाजता निघाली ती दुपारी साडेबारा वाजता सोलापूर रेल्वे स्टेशनवर आली. त्यावेळी प्रवासी संघटनेकडून गाडीचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रवाशांना मिठाईचे वाटप करण्यात आले. ही गाडी दुपारी १ वाजून २० मिनिटानी हैदराबादला रवाना झाली. या गाडीला तिलाटी, अक्कलकोट, गाणगापूर, कलबुर्गी, वाडी येथे थांबा आहे. यावेळी प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजू जाधव, राजेंद्र कांबळे, गौतम कांबळे, अस्लम शेख, आसिफ शेख आदी उपस्थित होते.

# कुर्डूवाडी येथे दारू पाजण्याच्या कारणावरून फायटरने मारहाण

**सोलापूर** : दारू पाज नाहीतर ७० हजार रुपये व्याजाने दे, असे म्हणत लोखंडी फायटरने केलेल्या मारहाणीत अरुण जगन्नाथ गायकवाड (वय ५२ रा.कुर्डूवाडी ) हे जखमी झाले. ही घटना कुर्डूवाडी येथील रेल्वे कॉलनी जवळ असलेल्या मारुती मंदिराजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना कुर्डूवाडी येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना जितेंद्र घोडके याने मारहाण केली . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी कामाला लागा : पालकमंत्री

सुराज्य/सोलापूर



जिल्ह्यात अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळाली आहे. परंतु, काही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. त्यांना तात्काळ मदत मिळण्यासाठी प्रशासन यंत्रणे युध्दपातळीवर काम करावे असे आदेश राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. जिल्हा विकास यंत्रणाअंतर्गत सर्व प्रशासकीय विभागाचे अधिकाऱ्यांचा कामकाज आढावा व पदाधिकारी यांच्या समवेत समन्वय बैठकी घेतली या बैठकीत मार्गदर्शन करताना विखे पाटील बोलत होते.

जिल्हा नियोजन भवन येथे झालेल्या या बैठकीस खासदार रणजीतसिंह नाईक - निंबाळकर, आ. राजेंद्र राऊत, रणजीतसिंह मोहिते- पाटील, समाधान आवताडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, महापालिका आयुक्त शीतल तेली उगले, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे उपस्थित होते. सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी शासन सकारात्मकतेने काम करत आहे. जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, अधिकारी यांनी परस्पर सहकार्याने जिल्ह्याच्या विकासात भर घालण्यासाठी कार्य करावे. अधिकाऱ्यांनी सामान्य जनतेची कामे आत्मियतेने करून मार्गी लावावीत अशा सूचना देखिल पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी महाराजस्व अभियानातून शेतरस्ते, शिवरस्ते, पाणंद रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत. जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे तात्काळ मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाकडून १६०० रोव्हर मोजणी यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यामुळे जिल्ह्यातील जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे भविष्यात मार्गी लावण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या

मंगळवेढा येथे बसवेश्वर स्मारकाचे काम तात्काळ मार्ग लावण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. उजनी विभागाचा उजवा कालवा फुटल्याने शेतात पाणी गेल्याने शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या शेत पिकांची नुकसान भरपाई तात्काळ द्या असे आदेश पालकमंत्र्यांनी यावेळी दिले

# सर्व आरोग्य केंद्रात उष्माघात नियंत्रण व उपचार केंद्र सुरू करा

## सीईओ स्वामी यांचे आरोग्य विभागास आदेश



**सोलापूर** : सध्या उन्हाचे चटके बसू लागले आहेत. जिल्ह्यातील तापमानाचा पारा चाळीशी पार गेला असून या महिन्यात पारा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर उष्मायाताने जिल्ह्यातील कोणीही उष्मायाताने बाधीत होवू नये म्हणून सीईओ स्वामी यांनी जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात नियंत्रण व उपचार केंद्र सुरू करण्याच्या सूचना आरोग्य विभागास दिल्या आहेत. वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना स्थापन करण्याच्या नियोजनाची व्हिडिओ कॉन्फरन्सला मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे मार्गदर्शन करताना यावेळी आवश्यक सूचना देण्यात आल्या.

आपला दवाखाना स्थापन करण्याची कार्यवाही जिल्हाभरात जोमात सुरू आहे. याप्रसंगी जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बिरुदेव दुधभाते, प्रशासन अधिकारी डॉ. मोहन शेगर यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. यावेळी राज्य शासनामार्फत १९ लसीकरण कार्यक्रमांतर्गत नाकावाटे घ्यावयाचा. इन्कोव्हॅक लसीची खरेदी करण्यात येऊन जिल्हा व मनपाला वितरीत करण्यात येणार आहे. सध्या राज्यात कोविड- १९ आजाराच्या रुग्णांची वाढती संख्या व झालेल्या मृत्यूचे विश्लेषण केले असता कोविड-१९ मृत्यूचे प्रमाण हे ६० वर्षावरील नागरीकांमध्ये जास्त असल्याचे दिसून येते.

यास्तव इन्कोव्हॅक लसीचा पुरवठा झाल्यानंतर ६० वर्षांवरील नागरीकांच्या प्रिकॉशन डोससाठीच लस फक्त वापरण्यात यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सोनिया बागडे यांनी केले.

### उष्माघात प्रतिबंधात्मक माहिती फलक लावणार

उष्माघात नियंत्रण व उपचार केंद्रात उष्माघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांबद्दल माहिती फलक लावून जनजागृती करण्यात येणार आहे. उष्माघाताबद्दल आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आरोग्य शिक्षण दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे उष्माघाताने त्रस्त रूग्णांना आवश्यक त्या उपचाराची सोय केली जाणार आहे. ग्रामपंचायत कार्यालयात देखील उष्माघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांबद्दल माहिती फलक लावून जनजागृती करण्यात येणार आहे.

# रेल्वेच्या स्वच्छतागृहात गळफास घेऊन आत्महत्या

**पंढरपूर** : रेल्वेच्या स्वच्छतागृहात एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली. याबाबत रेल्वे पोलिसांनी पंढरपूर पोलिसांना माहिती दिली आहे. गळफास घेतलेल्या व्यक्तींची ओळख पटत नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. दादर-पंढरपूर फास्ट पॅसेंजर या गाडीच्या बोगी नं.डी-४ च्या स्वच्छतागृहामध्ये एका अनोळखी पुरुषाने प्लॅशर पाईपच्या दांड्याला शर्टाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

या अनोळखी मयत व्यक्तींचे वय अंदाजे ३५ वर्षे, उंची ५ फुट ४ इंच, रंगाने गोरा, चेहरा उभट, नाक सरळ, अंगाने सडपातळ, कपाळावर मध्यमागी तीळ, अंगात निळ्या रंगाचा जिन्सचा शर्ट, राखाडी पॅन्ट असलेला अनोळखी पुरुष मयत स्थितीत आढळून आला आहे. याबाबत संबंधितांनी पंढरपूर रेल्वे पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे, आवाहन करण्यात आले आहे.

# बरुरमध्ये एकाच रात्री तीन घरे फोडली चार लाखांचा ऐवज लंपास

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकाच रात्री बरुर येथे तीन घरे फोडून अज्ञात चोरट्याने एका घरातून सोने व रोख रक्कम असा चार लाखाचा ऐवज लंपास केला. इतर दोघांच्याही घरात चोरी झाली. शुक्रवारी रात्री ११ ते शनिवारी पहाटे तीन सुमारास झालेल्या या घटनेची मंद्रुप पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे.



साहेबलाल हुसेनी शेख, रा.बरुर (तालुका दक्षिण सोलापूर) हे सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने ते आपल्या घरावरती कुटुंबासह झोपले होते. तेव्हा चोरट्याने त्यांचे बंद घराचा दरवाजा तोडून आत मध्ये प्रवेश केला. घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे बोरमाळ, गंठण, अंगठी व चांदीचे पैंजण तसेच रोख रक्कम तीन लाख रुपये असा एकूण चार लाख ५ हजारांचा मुद्देमाल चोरला. त्यानंतर त्यांच्या शेजारी राहणाऱ्या कस्तुराबाई हुसेनी दोडमणी व मलप्पा परसप्पा रगटे यांच्या घरात प्रवेश करून अज्ञात चोरट्याने चोरी केली. त्यांचे सोन्याची दागिने व रोख रक्कम गेल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अमित कुमार करपे यांनी घटनास्थळी भेट देवून तपास सुरू केला.तसेच अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, आयपीएस अधिकारी साटम, रोहिणी बनकर, डी वाय एस पी राजेंद्रसिंह गौर व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत सूचना केल्या. अधिक तपास साहेब पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे करीत आहेत.

# शास्त्रीनगरात पिसाळलेल्या कुत्र्यांनी घेतला ३० जणांना चावा

## जखमी व्यक्तींनी दिले मनपा उपायुक्तांना निवेदन

सुराज्य/सोलापूर

शास्त्री नगरात पिसाळलेल्या व भटक्या कुत्र्यांनी ३० अबालवृद्धांना चावा घेतल्याने अनेकजण जखमी झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. शहरातील प्रभाग क्रमांक २८ परिसरातील भटक्या आणि पिसळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशा मागणीचे निवेदन शहर मध्यचे युवक अध्यक्ष वाहिद विजापुरे यांच्यासह कुत्र्यांनी चावा घेतलेल्या जखमी चिमुकले, नागरिकांच्या उपस्थितीत मनपा उपायुक्त विद्या पोळ यांना निवेदन दिले.



प्रभाग क्रमांक २८ मधील शास्त्रीनगर भागात पिसाळलेल्या भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झाल्यामुळे स्थानिक रहिवाशांना त्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना रात्रीच्या वेळेस घराबाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांनी चावा घेतल्यामुळे नवीलाल डोंगरी, जायदा डोंगरी, मेहबूब नदाब, आयशा ताडे, हुसेन कुरेशी, नुसरत डोंगरी यांच्यासह अनेक जखमी झाले आहेत. कुत्र्याने यांच्यापैकी गळ्याला, हाताला कमरेला पायाला चावा घेतला आहे. या भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त महापालिकेने त्वरित करावा व नागरिकांना होणारा त्रास त्वरित बंद करावा अशा मागणीचे निवेदन परिसरातील नागरिकांतर्फे, सोलापूर शहर मध्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष वाहिद विजापुरे यांनी महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांना दिले आहे. यावेळी परिसरातील महिलांसह जखमी झालेले बाल व ज्येष्ठ नागरिक देखील उपस्थित होते. लवकरात लवकर कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशाराही विजापुरे यांनी दिला.

### अँटि रेबीज सिरम इंजेक्शन महापालिकेडे नसते : डॉ. लोहारे

रेबीज (एआरव्ही) इंजेक्शन महापालिकेच्या दवाखान्यामध्ये मुबलक उपलब्ध आहे. मात्र पिसाळलेले कुत्रे चावल्यानंतर देण्यात येणारी अँटि रेबीज सिरम हे इंजेक्शन रुग्णास ॲडमिट करून निरीक्षणाखाली ठेवूनच द्यावे लागते. यामुळे ते महापालिका दवाखान्यात देण्यात येत नाही. हे इंजेक्शन सोलापूर शासकीय रुग्णालयातच देण्यात येते, अशी माहिती आरोग्य अधिकारी डॉ बसवराज लोहारे यांनी दिली.